

A{^fH X idr
सर्पबळी

# सर्पबळी

## अभिषेक दळवी

ई साहित्य प्रतिष्ठान



सर्पबळी (भयकथासंग्रह)

लेखक :नाव :अभिषेक अनिल दळवी.
पत्ता :बी /602, प्रसाद को. ऑप. हौ. सो. लिमिटेड, जनता मार्केट,
सुभाष रोड, भांडुप (प), मुंबई 400078
फोन :09969289617
abhishekdalvi966@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .



# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :१५ ऑक्टोबर २०१६


©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी - घेणे आवश्यकआहे .




# मनोगत



**सर्पबळी** हा भयकथासंग्रह तुमच्यासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होतं आहे. याचं सर्व श्रेय जातं ते तुमच्यासारख्या वाचकांना, ज्यानी मला वेळोवेळी उत्तम प्रतिसाद देऊन पुढे कथा लिहण्यासाठी प्रोत्साहित केलं.

लहानपणी गोष्टीं, कथा ऐकण्याची आवड प्रत्येकाला असते, तशीच मलाही होती. पण जेव्हा भयकथांची वेळ यायची तेव्हा गांभिर्य, उत्कंठा, भिती असे संमिश्र भाव हृदयातून तरळून जायचे यातूनच भयकथांची आवड वाढत गेली. मित्र मैत्रिणींना भयकथा रचवून सांगणे हा एक छंदच बनून गेला. " मुलांना घाबरवतो "म्हणून अनेकदा शिक्षकांचा ओरडा प्रसंगी शिक्षाही भेटली. पण भयकथांमधली रुचि वाढतच होती त्यानंतर " रत्नाकर मतकरी,

नारायण धारप" यांसारख्या दिग्गजांच्या कथांचे बाळकडू मिळत गेले आणि लिखाणाला प्रारंभ झाला. कथा रचून त्या फेसबूकद्वारे जगासमोर आणल्या आणि वाचकांचाही भरघोस प्रतिसाद मिळाला त्या कथांमधीलच काही निवडक कथांचा संग्रह म्हणजे सर्पबळी.

महत्वाचे म्हणजे ज्यांच्यामुळे हे सर्व शक्य होतंय त्या ई साहित्य प्रतिष्ठानचे खूप खूप आभार. ई साहित्य प्रतिष्ठान उत्तमोत्तम पुस्तके मोफत उपलब्ध करून आमच्यासारख्या वाचकांसाठी पर्वणी आणि लेखकांसाठी संधी उपलब्ध करून देत आहे त्याबद्दल धन्यवाद.

मी सध्या फ़ार्मसीचा विद्यार्थी आहे. लवकरच नोकरी व्यवसायाला लागेन. या पहिल्या पुस्तकाला मिळणारा प्रतिसाद मला माझे आयुष्य एक लेखक म्हणून घडवून आणण्यासाठी खुप उपयुक्त ठरेल. तुमचे दोन ओळींचे पत्र, दोन शब्दांचा प्रतिसाद मला मोल्यवान ठरेल. वाट पहातो.

अभिषेक अनिल दळवी.

फोन :09969289617

abhishekdalvi966@gmail.com



अर्पणपत्रिका

पहिले पुस्तक अर्पण करावे अश्या दोन व्यक्ति आहेत.

आई आणि आजोबा

आजोबांनी मला भयकथांची

आणि आईने वाचनाची ओळख करून दिली

यातूनच लेखनास प्रारंभ झाला.

यांना हे पुस्तक कृतज्ञता पूर्वक अर्पण..



भयकथा हे मराठी साहित्यसंपदेतील एक महत्वाचे दालन आहे या पुस्तकाद्वारे कोणतीही अंधश्रध्दा पसरवण्याचा आमचा हेतु नाही.

निखळ मनोरंजनासाठी लिहिलेल्या या कथांतील घटना, पात्र, प्रसंग स्थळं सर्व सर्व काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबध नाही. आढळल्यास निव्वळ योगायोग समजावा.

अभिषेक दळवी

abhishekdalvi966@gmail.com

फोन :09969289617





# अनुक्रमणिका

पाठदुखी

स्वप्न

पैज the Bait

शिकार

चकवा

सर्पबळी

जनोबा

पैंजण

भूतबंगला



# पाठदुखी

रात्रीचे साडेदहा वाजले होते. बंगल्यात अंधार होता. बेडरूमधला नाईट लेंप चालू होता. बेडरूमच्या बालकनीचे पडदे वाऱ्याने हलकेच उडत होते. बालकनी समोर आरामखुर्चीत नचीकेत बसला होता. तो त्याचा आणि दिव्याचा भिंतीवरचा फोटो पाहत. दिव्या दिसायला अगदी सुंदर तिच्या सुंदरतेवरच तर नचिकेत भाळला होता त्या दोघांनाही मूलबाळ नव्हतं अर्थात दिव्याने होऊ दिलं नव्हतं तिला आपल्या स्वतंत्र आयुष्यात कोणाची अडचण नको होती ती जितकी सुंदर होती तितकीच विलासी आणि ऐशोआरामी.... नचिकेत आरामखुर्चीतून उठून बाल्कनीत जाऊ लागला. तिच्या या विलासी स्वभावामुळे आपण काय काय केलंय याची त्याला पुरेपूर जाण होती. पार्लरमधून नंतर पार्टीला जायचंय सांगून सहा वाजता घरातून बाहेर पडली होती तिचा अजून पत्ता नव्हता हे नेहमीचं होतं. तिचं सोशियल वर्क, मीटिंगच्या नावाने दिवस रात्र इथे तिथे भटकणं चालु असायचं... ती असतानासुद्धा त्याला एकटं एकटं वाटायचं.

"आअ... आई "नचिकेतच्या पाठीतून जोरात कळ गेली त्याला एक दीड महिन्यांपासून पाठदुखीचा त्रास सुरू झाला होता. नुकतीच वयाची तीसावी ओलांडलेल्या



तरूणाला असं पाठीत दुखणं नवलच होतं. आधी अधून मधून कळा यायच्या नंतर नंतर वारंवार येऊ लागल्या आता तर दिवस रात्र दुखणं चालूच होतं किती डॉक्टर, स्पेशलिस्ट चालू होते त्यांच्या मते नचिकेतला काही झालंच नव्हतं रिपोर्ट्स सगळे नॉर्मल... पण त्रास जात नव्हता पेन कीलर घेतल्यावर थोडं बरं वाटायचं.

खालून गाडीचा आवाज आला दिव्याची गाडी गेटमधून आत येत होती दिव्या त्यातून उतरली. उंची साडी, भडक मेकअप, दागिने ती बंगल्याच्या दाराकडे येऊ लागला तिला पाहून नचिकेत जिन्याजवळ चालू लागला तिच्याकडे लॅच होती पण सगळ्या बंगल्यातली लाईट बंद होती ती अंधारात अडखळु नये म्हणून नचिकेत जिन्याकडे येऊ लागला. तो येईपर्यंत ती घरात येऊन जिन्यापर्यंत पोचली तो वरतीच थांबला. जिना नव्या पद्धतीचा होता. त्याला रेलिंग नव्हते. दिव्या एक हाताने भिंतीचा आधार घेत अंधारात चाचपडत वर येत होती वर आल्यावर समोरच नचिकेत उभा होता त्याला पाहून तिने एक स्माइल दिली पण.. पण लगेच तिच्या चेहऱ्यावरच हसू मावळलं, डोळे मोठे झाले आणि तिने जोरात किंकाळी फोडली तिच्या किंचाळल्याने तो दोन पावलं मागे सरकला.

" अगं घाबरतेस काय मी नचि..... थांब लाइट लावतो "म्हणत तिच्या जवळ जाऊ लागला

" प.. प.... पुढे नको येऊस तिथेच... तिथेच थांब "भीतीने तोंडातून शब्द फुटत नव्हते पण कशीबशी बोलली.



दिव्याचे डोळे विस्फारले होते ती हळु हळु नचिकेतपासून मागे सरकू लागली. ती इतकी का घाबरलीय हे नचिकेतलाही कळत नव्हतं.

"अगं असं काय करतेस "शेवटी न रहावून त्याने आवाज चढवून विचारलंच.

"तू.. तूझ्या पाठीवर "त्याच्या खांद्याकडे बोट दाखवत बोलली.

दिव्या हळु हळु मागे सरकत होती

"पाठीवर काय? "नचिकेत वैतागून बोलला.

दिव्या मागे सरकत सरकत जिन्याच्या कडेपर्यंत पोचली जिन्याला रेलिंग नव्हतं इतक्यात तिचा तोल जाऊन सरळ खाली हॉलमधे पडली डोके टीपॉयवर आपटून रक्त वाहू लागलं नचिकेतने खाली आला तिच्या डोक्याला आणि मानेला जखम झाली होती लगेच तिला हॉस्पिटलमधे हलवलं.

आज या घटनेला दोन दिवस झाले. दिव्या पडली आणि डोक्याला जबर मार लागला, टीपॉयच्या काचा मानेत घुसल्या रक्तही भरपूर गेलं तिला हॉस्पिटलमधे नेईपर्यंत तिने प्राण सोडले. आज नचिकेत बंगल्याच्या टेरेसवर उभा होता आकाशात अर्धचंद्र दिसत होता, थंड वारा वाहत होता, टेरेसच्या दोन कोपऱ्यात दोन छोटे लॅंप जळत होते, हातात व्हिस्कीचा ग्लास होता. नचिकेत भरपूर उदास होता. तो आणि त्याचे तीन पार्टनर एकत्र या



शहरात रहायला आले. एकाने आत्महत्या केली, एकाला हार्टअटॅक आला आणि दिव्याच असं झालं काहीच चांगलं होत नव्हतं. हळु हळु त्याचा जीवन क्रम डोळयांसमोरून जाऊ लागला.

वडील त्याच्या लहानपणीच वारले आईने कष्टाने वाढवलं, शिक्षण पूर्ण केलं. बँकेत चांगली नोकरीही लागली. आईने आनंदाने डोळे मिटले. नंतर नचिकेतच्या एकाकी आयुष्यात दिव्या आली. मैत्रीच रुपांतर हळूहळू प्रेमात झालं आणि लवकरच लग्नही झालं. नचिकेतला वाटलं दिव्या आता तरी सुधारेल. पण नाही. लग्नानंतर कोणतीच जवाबदारी ती निभावत नव्हती. तिचं बेबंद वागणं दिवसेंदिवस वाढत चाललं होतं. तीचे शौक बँकेच्या पगारात पूर्ण होत नव्हते ह्याच्याकडून पैसे उसने घे त्याच्या उधाऱ्या हे वाढतच चाललं होतं. तेव्हाच त्याची ओळख बँकेतल्या चंद्रकांत नावाच्या सहकाऱ्याशी झाली. तो वयाने नचिकेतपेक्षा पंधरा सोळा वर्ष मोठा होता. त्यालाही पैशांची लालूच होतीच. त्या दोघांची ओळख नंतर विक्रम आणि प्रतापशी झाली. विक्रम आणि प्रताप आधीपासून गुन्हेगारी विश्वात मुरले होते. चौघांनी मिळून बँक लुटायचा प्लॅन बनवला. त्या साठी त्यांना बँकेचा सेक्यूरिटी इनचार्ज एकनाथला सामील करायची गरज होती. एकनाथ ईमानदार होता पण परिस्थिती पुढे हतबल होता त्याच्या मुलाच्या ऑपरेशनसाठी पैशाची गरज होती. पाचही जणांनी मिळून बँक लुटली आणि बँक लूटल्यावर लगेच ते चौघे गायब झाले. पोलिसांच्या भीतीने कोणीही बाहेर येत नव्हतं आणि पैशाच्या वाटण्याही झाल्या नव्हत्या. एकनाथला ऑपरेशनला पैसे नाही मिळाले म्हणून त्याचा मुलगा दगावला. ते पाहून त्याच्या बायकोनेही



हाय खाल्ली. काही दिवसांनी चौघे पैशाच्या वाटणीसाठी विक्रमच्या मित्राच्या फार्महाउसवर जमले सोबत सेलिब्रेशनसाठी दारू होतीच. तेवढ्यात तिथे एकनाथ आला तो कदाचित ह्यांच्या पाळतीवरच होता. त्याचं असं अचानक येणं चौघांना अनपेक्षित होतं. पैसे न मिळाल्याने त्याच्या मुलाचा आणि बायकोचा जीव गेला म्हणून तो रागातच होता आणि हे लोक असे पार्टी करताना पाहून त्याचा पारा आणखीनच चढला. बँकेतल्य चोरीची पोलीसांना कबुली देण्याची धमकी देऊन तेथून तो निघाला. हे चौघेही त्याला पकडायला निघाले. त्याला पकडलाही. पण तो काहीच ऐकायला तयार नव्हता. त्याला पैशाची हाव नव्हती. पण आपल्या मुलासाठी तो या चोरीत सहभागी झाला होता. तो मुलगाच आता हयात नव्हता आणि सर्वाला हे चौघे जवाबदार होते. तो काही ऐकून घेत नाही हे पाहून सर्व त्याला मारू लागले, तुडवू लागले. प्रत्येकाच्या डोक्यात दारू भिनली होती त्याला इतका मारला की त्यातच त्याचा म्रुत्यू झाला. फार्महाउसच्या मागे जंगल होतं त्याला एकेकाने पाठीवर घेत जंगलात आणलं आणि गाडलं.

नंतर चोघेही दुसऱ्या शहरात रहायला आले. बंगले घेतले, गाड्या घेतल्या, बिझनेस सुरू केला पण एकाच्याही आयुष्यात सुख नव्हतं पहिल्या सहा महिन्यातच प्रतापने आत्महत्या केली. चंद्रकांत तर ऑफिसला जायची तयारी करत होता केस उगवताना आरशात काय दिसलं कोणास ठाऊक त्याला तीव्र हार्टअटॅक आला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या दोघांनाही मरायच्या काही दिवस आधी पाठदुखी सुरू झाली होती. नचिकेतला



अस्वस्थ वाटत होतं पाठीच दुखंणं तर होतंच आपल्यालाही पाठदुखी आहे कदाचित आता आपण...... त्याने लगेच तो विचार झटकून टाकला.

मध्यरात्र उलटून गेली होती. नचिकेत टेरेसवरून बंगल्यात जाण्यासाठी दरवाजाकडे वळला इतक्यात त्याचं लक्ष बाजूच्या काचेच्या खिडकीकडे गेलं खिडकीत त्याचं प्रतिबिंब दिसत होतं त्याच्या पाठीवर काही तरी होतं. त्याने जवळ जाऊन निरखून पाहिलं. त्याला धक्काच बसला. त्याच्या हातातून व्हिस्कीचा ग्लास सुटला आणि खळकन फुटला. त्याचा श्वासोच्छ्वास वाढू लागला. कारण त्याच्या पाठीवर... त्याच्या पाठीवर... एकनाथ होता. अगदी त्याच अवस्थेत जेव्हा त्याचं प्रेत पुरायला नेताना एकेकाने पाठीवर घेतलेलं. नचिकेतला आता त्याच्या पाठदुखीचं, चंद्रकांतच्या हार्ट अटॅकच आणि दिव्याच्या घाबरण्याचं कारण कळत होतं...... त्यांनीही तेच पाहिल असणार जे नचिकेत पाहत होता..... नचिकेतच्या नजरा त्याच्या वरून हलत नव्हत्या. त्याचे सफेद हात नचिकेतच्या खांद्यावरुन पुढे आले होते, त्याचा चेहरा नचिकेतच्या चेहऱ्याच्या बाजूलाच होता, कपाळावर उभी खोक दिसत होती जी त्याला मारतेवेळी आलेली, जबडा एका बाजूने पूर्ण निखळला होता म्हणून तोंड वाकडं दिसत होतं आणि डोळयाच्या जागी सफेद बूबूळं जी नचिकेतवर रोखलेली होती.

नचिकेत भितीने मागे जात जात बंगल्याच्या कठ्ड्यापर्यंत पोचला......... आ.. आ... आ.................. तीव्र किँचाळी बंगल्याच्या आवारात घूमली.



नशेमधे नचिकेत टेरेसवरून पडला असेल असा पोलीसांनी निष्कर्ष काढला पुढच्या तपासासाठी विक्रमला पोलीस स्टेशनला बोलावलं तो एकटाच पार्टनर आता उरला होता. विक्रमची गाडी पोलीस स्टेशन समोर येऊन थांबली विक्रम गाडी तून उतरला. आई....... ग...... त्याच्या पाठीतून एक जोरात कळ गेली कदाचित.. कदाचित त्याचीही सुरू झाली होती "पाठदुखी " शेवटची..





# स्वप्न

कावेरी खडबडुन जागी झाली. गाडीचा AC चालु असूनही तिला दरदरुन घाम फुटला होता. ती आजुबाजुला पाहू लागली बाजूलाच कुमार बसला होता. " किती भयानक स्वप्न होतं " ती एका हाताने चेहऱ्यावरचा घाम पुसत पुटपुटली कुमार गाडी चालवत चालवत तिच्याकडे पाहू लागला.

"काय गं काय झालं एवढं दचकायला? "कुमार गाडी बाजूला घेत बोलला.

" काही नाही रे स्वप्न पडलं.. किती वाजले? कुठंपर्यंत पोचलोय? "कावेरीने विचारलं.

"सव्वाबारा वाजलेत अजून सहा सात तास तरी लागतील "बोलता बोलता कुमारने गाडी पुन्हा रस्त्यावर आणली.



कावेरी आणि कुमारचं एका वर्षापूर्वीच लग्न झालं होतं. कुमारला नोकरीमधे रूजु होऊन एक दोन महीने होऊन गेले होते तेव्हाच कावेरीची बदली या ऑफिसला झाली. नवं शहर आईवडिलांपासून दूर राहणं यामुळे थोडी बावरली होती तिला कोणाच्या तरी मैत्रीची गरज होती आणि कुमारला हीच संधी हवी होती त्याने कावेरीला जेव्हा पाहिलं होतं तेव्हापासूनच ती त्याला आवडली होती. त्या दोघांची एकमेकांशी मैत्री झाली. हळूहळु मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. दोघांच्याही घरातून लग्नाला आधीपासून विरोध होताच. नंतर कुमारच्या हट्टापुढे त्याच्या घरच्यांनी नमत घेतलं.

पण कावेरीचे बाबा शेवटपर्यंत तयारच नव्हते. आणि त्याला कारणही तसंच होतं. कावेरीच्या पत्रिकेनुसार तिच्याशी लग्न करणाऱ्याच्या आयुष्यात एका वर्षा आत मृत्यूयोग होता आणि तिच्याही जीवाला धोका होता. तिच्या बाबांचा अशा गोष्टींवर गाढ विश्वास होता. त्यामुळे रागाने नाही पण आपल्या मुलीच्या भविष्याच्या भीतीने ते राजी होतं नव्हते. आणि पुढे कधी होतील याची शाश्वती नव्हती. शेवटी कुमार कावेरीने पळून जाऊन त्यांच्या मर्जीविरुध्द लग्न केलंच. सुरूवतीला रागाने तिच्या वडिलांनी अबोला धरला पण मुलीचा संसार नीट चाललाय पाहून तो राग निवळला.

आज लग्नाला एक वर्ष पूर्ण होऊन गेलं होतं वर्षभरात त्यांच्या आयुष्यात एकही वितुष्ट आलं नाही त्यांचं चांगलं चाललं होतं म्हणून कावेरीच्या माहेरी जाताना एक विजयी आनंद दोघांच्याही चेहऱ्यावर होता. रविवारी सकाळी तिच्या गांवी पोहचले कुलदैवतेचं दर्शन घेऊन जेवण खाण आटोपून संध्याकाळी निघाले जेणे करून रात्री प्रवास



करून सकाळी पोचता येईल. कावेरी खिडकीतून आजुबाजुला पाहत होती रस्त्याच्या कडेने एक बोर्ड गेला त्यावर "काळंशेत" लिहिल होतं.

या काळंशेतवरून तिला काही तरी आठवलं काल परवाच तिने पेपरात एक बातमी वाचली होती या परिसरात एक मनोरुग्ण रात्रीच्या वेळी लोकांवर हल्ले करतो. पोलीस त्याच्या मागावर आहेत त्यांनी त्याच्यापासून सावधानतेचा इशाराही दिला होता. हा रस्त्यावर रहदारी अजिबात नव्हतीच. किती तरी वेळाने एखादी गाडी बाजूने जात होती.

"हा रस्ता एवढा सुनसान का वाटतोय रे? कावेरीने कुमारला विचारले

"अग हे रस्ते सुनसानच असतात आपण शहरापासून बरेच दूर आहोत "

"तरी बाबा बोललेले इतक्या रात्रीचा प्रवास नको म्हणून "

"तूझे बाबा माझ्याशी लग्न करू नकोस असंही म्हणालेले तरीही केलंस ना? कुमार तिची थट्टा करत बोलला.

" बास बास राहू दे "म्हणत कावेरीने विषय संपवला.

खिडकीतून रस्त्याच्या कडेला एक मंदिर दिसलं म्हणून तिने थोडा वेळ डोळे बंद केले तितक्यात करकचून ब्रेक लागून गाडी थांबली तिने डोळे उघडून पाहिल. कुमार



गाडीचे हॉर्न वाजवत होता गाडीसमोर एक काळं मांजर होतं. गाडीच्या हेडलाईटचा प्रकाश डोळयांवर पडल्याने त्याचे हिरवे डोळे अजूनच चमकत होते. त्याला वाचवायच्या नादात कुमारने ब्रेक मारले होते. दोन मिनिटांनी ते रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला निघून गेलं पण कावेरी मात्र थोडी भांबावली होती. कुमारने गाडी पुन्हा चालू केली

"गाडी पुढे नको नेऊस "कावेरी कुमारला अडवत म्हणाली.

"पुढे नको नेऊ पण का? कुमारने विचारले.

"ते मांजर पाहीलस ना? काळं मांजर आडवं गेलंय "

" मग आता इथेच बसूया मांजर आडवं गेलं म्हणून "कुमार वैतागून बोलला.

कावेरी थोडी हळवी होती आणि बालपण गावात गेल्याने अशा गोष्टींवर विश्वासही होता कुमारने गाडी सुरू केली न केली तोच थोडं पुढे जाऊन गाडी खड़ख़ड आवाज करत थांबली.

" ओह शटट... आता हिला काय झालं " कुमार पुटपुटला.

" काय झालं " कावेरीने विचारलं.

" थांब एक मिनिटात बघून आलो " म्हणत कुमार गाडीतून उतरुन बोनेटकडे गेला.



बोनेट उघडून पाहिल इंजिन फार गरम झालं होतं रेडिएटर मधलं पाणी संपलं होतं. तो बोनेट बंद करून कावेरीच्या खिडकीजवळ आला.

" अगं रेडिएटर मधलं पानी संपलंय बाजूला कुठे भेटतंय का बघतो "कुमार बोलला.

"थांब मी पण येते "

" आता तू कुठे येतेयस तू थांब गाडीतच मी लगेच जाऊन आलो " म्हणत कुमार डिकिकडे गेला.

" सांभाळून जा " कावेरी कुमाराकडे पाहत म्हणाली.

कुमारंने डिकितून रिकामा कॅन काढला आणि मोबाईलचा फ्लॅश चालू करून रस्त्याच्या बाजूला झाडांमधे अंधारात दिसेनासा झाला. कावेरीने एक जांभई दिली तिच्या डोळयावर झोप येत होती रस्त्यावर दुसरं कोणतंही वाहन दिसत नव्हतं म्हणून सगळीकडे शांतता पसरली होती. कावेरीने मागे सीटला डोकं टेकवलं इतक्यात थंड शांततेला चिरत जाणारी एक जोराची किंकाळी तिथे घुमली.

कावेरी दचकली. तो आवाज अगदी कुमारसारखाच वाटत होता. कावेरी गाडीच्या बाहेर आली. आजूबाजूला पाहिलं तर रस्त्यावर एखादं चिटपाखरूही नव्हतं. ती किंकाळी कुमारचीच होती एवढं नक्की... कुमार ज्या दिशेला गेला तिथे ती पाहू लागली पण

त्या झाडांमधे आणि त्या अंधारात तो कुठेच दिसत नव्हता. कावेरीला काय करू हे समजत नव्हतं. ती सैरभैर झाली. तितक्यात कुमार ज्या दिशेला गेला होता तिथून तिला झाडांमागून एक आकृती येताना दिसली. तिच्या जीवात जीव आला. ती धावतच कुमारकडे निघाली. पण दहा बारा पावलावरच थांबली. कारण तो कुमार नव्हता. अंधारात चेहरा नीट दिसत नव्हता पण तो कुमार नव्हता तो जो कोणी होता तो डाव्या पायाने लंगड़ा होता त्याच्या डाव्या हातात काठी आणि उजव्या हातात कोयता. कावेरीला ती बातमी आठवली त्यातलं त्या मनोरूग्णाचं वर्णन जवळपास असंच होतं. कावेरी आता पूर्णपणे घाबरली होती तो माणूस लंगडत वेगाने तिच्या जवळ येऊ लागला. कावेरी त्याच्या पासून दूर अंधारात धावत सुटली तोही तिच्या मागे येऊ लागला. आपण कुठे जातोय हे तिला कळत नव्हतं. ती ठेचकाळत होती, झाडांना आपटत होती पण धावत होती.

कावेरी आता थोडा वेळ थांबली तो लंगडण्याचा आवाज आता येत नव्हता म्हणजे तो माणूस आता तिच्या पासून दूर राहिला होता. कावेरीने आपल्या चेहऱ्यावर आलेले केस मागे घेतले आणि दम खाऊ लागली. तिचं लक्ष बाजूला गेलं तिथे कोणीतरी पडलं होतं तिने जवळ जाऊन पाहिल तर तो कुमार होता त्याच्या गळयावर वार केला होता सम्पूर्ण शर्ट रक्ताने लाल झालं होतं ते पाहून तिने किंकाळी फोडली तिने कुमारच्या जवळ जाऊन त्याचं डोकं आपल्या छातीशी घट्ट पकडलं. कुमारचा देह निष्प्राण पडला होता. कावेरीचं रडणं त्या शांततेत अजूनच भयानक वाटत होतं. कावेरी हुंदके देत रडतच होती.



इतक्यात तिला पुन्हा त्या माणसाचा लंगडण्याचा आवाज येऊ लागला कदाचित त्याने कावेरीच्या किंकाळण्याचा आवाज ऐकला होता. तोच ऐकून तिच्या दिशेने तो येत होता. त्याचा तो जवळ येणारा आवाज ऐकून कावेरी स्वतःला सावरत उठली आणि बाजूच्या झाडामागे जाऊन लपली. तो माणूस जवळपास आला होता. कावेरी तोंडावर हात ठेऊन स्वतःचे हुंदके दाबत होती. तो माणूस कावेरी लपलेल्या झाडापासून दूर नव्हता कावेरी कानोसा घेऊ लागली. त्या माणसाच्या तोंडून हू.. हू.. आवाज येत होता तोही दमला असावा.

तिने झाडाच्या मागून हळूच बाहेर पाहिलं. तो माणूस अजून तिलाच शोधत होता. त्याच्या पायाजवळच कुमाराचा मोबाईल पडला होता त्याचा फ्लॅश चालू होता त्या प्रकाशात त्याचं रूप आणखीनच भयानक दिसत होतं. हातात रक्ताने माखलेला कोयता, गालफड आत गेलेला चेहरा त्यावर सफेद खुरटी दाढी, कृश बांधा, वयाने म्हातारा, खांद्यापासून उजव्या हाताची बाही फाटलेला शर्ट, शर्टावर रक्ताचे शिंतोडे उडालेले. कावेरी इतक्या वेळाने त्याला फार जवळून पाहत होती. कावेरी मटकन डोळे बंद केले भीतीपोटी अजून काही पाहण्याची तिच्यात हिम्मतच उरली नव्हती.

तो माणूस थोडावेळ तिथेच घुटमळून पुढे जाऊ लागला. त्याचा काठी टेकत चालण्याचा आवाज तिच्यापासून लांब जाऊ लागला. त्याला दूर गेलेलं पाहून कावेरीने तोंडावरचा हात काढला. झाडाला पाठ लावून हुंदके देत खाली बसली तो माणूस दूर



गेल्यावर थोडी शांतता पसरली. काही तासापूर्वीचं कावेरीचं जग किती वेगळं होतं पण आता.. आता सगळ बदललं होतं. दोन क्षण शांततेत जात नाही तोपर्यंत तिच्या मोबाईलची रिंग वाजली त्या आवाजाने ती दचकली पण लगेच तिने खिशातून मोबाईल काढला मोबाईलचा आवाज त्या माणसापर्यंत पोहोचू नये म्हणून फोन कट करू लागली पण थरथरत्या हातांनी फोन कट होतं नव्हता. उलट मोबाईलचा आवाज जास्तच येत होता. शेवटी नाईलाजाने मोबाईल जवळच्या दगडावर तीनदा चारदा आपटला तेव्हा तो फुटून त्याचा आवाज बंद झाला. आता थोडी शांतता पसरली. कावेरीने सुटकेचा निश्वास सोडला.

आपल डोकं झाडाच्या खोडावर टेकवून डोळे बंद केले तितक्यात तिला आपल्या बाजूला हालचाल ऐकू आली तीने डोळे उघडून पहिलं तर तिच्यापासून दोन फूटावर तो माणूस उभा होता तो मोबाईलचा आवाज ऐकून तिथंपर्यंत पोचला होता त्याची नजर कावेरीवरच खिळली होती त्याने जोराचा श्वास घेऊन कावेरीला मारायला कोयता उचलला आणि.............................................

कावेरी खडबडुन जागी झाली तिला दरदरुण घाम फुटला होता इकडे तिकडे पहिलं ती गाडीतच होती बाजूला कुमार होता तिला स्वप्न पडलं होतं "किती भयानक स्वप्न होतं "ती एका हाताने चेहऱ्यावरचा घाम पुसत पुटपुटली. कुमार गाडी चालवत चालवत हिच्याकडे पाहू लागला.

" काय गं काय झालं एवढं दचकायला? "कुमार गाडी बाजूला घेत बोलला.



" काही नाही रे स्वप्न पडलं.. किती वाजले? कुठंपर्यंत पोचलोय? "कावेरीने विचारलं.

" सव्वाबारा वाजलेत अजून सहा सात तास तरी लागतील "बोलता बोलता कुमारंने गाडी रस्त्यावर आणली.

कावेरीला थोडं विचित्र वाटत होतं त्यांचं बोलणं अगदी तसंच होतं जस स्वप्नात घडलं होतं तिचं लक्ष बाहेर गेलं रस्त्याच्या कडेने एक बोर्ड गेला ज्यावर " काळंशेत " लिहलं होतं तो बोर्डही अगदी तसाच होता जसा तिला स्वप्नात दिसला होता. कावेरीचं लक्ष बाहेरच होतं. ती ते स्वप्न आठवत होती त्या बोर्ड नंतर मंदिर दिसलं होतं ती लक्ष देऊन बाहेर पाहू लागली आणि रस्त्याच्याकडेने अगदी तसंच मंदिर गेलं जस तिने पाहिलं होतं तिचा या वर विश्वास बसत नव्हता. तिचं स्वप्न सत्यात तिच्या आयुष्यात घडत होतं. स्वप्नात जे सर्व पहिलं होतं ते आपल्या आयुष्यात खरंच घडलं तर या विचाराने तिच्या अंगावर शहारे आले इतक्यात करकचून ब्रेक लागून गाडी थांबली तिने घाबरत समोर पाहिलं. गाडी समोर एक काळं मांजर होतं त्याचे हिरवे डोळे गाडीच्या हेड लाइटमुळे अजूनच चमकत होते अगदी तसेच जसे स्वप्नात पाहिलेले........



# बेट

सम्या(समीर), रव्या(रविंद्र), पक्या(प्रकाश), गण्या(गणेश)हे चौघे इंजीनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला होते. एकदा हे वर्ष पूर्ण झालं की मग पुढचं शिक्षण किंवा नोकरी सुरू. एकदा हे सर्व सुरू झालं की कामाच्या गडबडीत कधी भेट होईल की नाही माहीत नाही. नुकतीच दिवाळीची सुट्टी सुरू होणार होती. सुट्टीतल पूर्ण प्लॅनिंग चौघे होस्टेलच्या रूममधे बसून करत होते.

" सम्या मी काय म्हणतोय या सुट्टीत घरी जाण्यापेक्षा कुठेतरी मस्त चार पाच फिरुन येऊया. "रवी स्टडी टेबलवर पुस्तक वाचत बसला होता तो पुस्तक बंद करत बोलला.

" मी पण तेच म्हणतोय पुन्हा कधी भेटू सांगता येत नाही. "समीर रवीकडे पाहत बोलला.

" गोव्याला जाऊया? " गण्याने सुचवलं.

" चार वेळा जाऊन आलोय " समीर बोलला.

" लोणावळा? " गण्या.



" माझं गाव तेच आहे तिकडे जाण्यात काय मजा? " रवी बोलला.

" शिमला कसं वाटतय? "समीरने सुचवलं.

" एक नंबर... " गण्या.

"मस्तच... "रवी.

" मग शिमला फाइनल ओके? "समीर सगळ्यांकडे पाहत बोलला.

प्रकाश हात डोक्याखाली घेऊन पायावर पाय टाकून मस्तपैकी बेड पडला होता.

" तुम्ही तिघे जा मला काय जमणार नाही. " एका कुशीवर परतत प्रकाश बोलला.

" जमणार नाही म्हणजे? "समीरने विचारलं

" का पण? "गण्या.

" अरे रामचा म्हणजे काकांच्या मुलाचा साखरपुडा आहे आणि आठवड्याभरात लग्न म्हणून.. "प्रकाश बेडवर उठून बसत बोलला.

" आरे काय यार तूझ्याशिवाय काही मजा नाही येणार. "रवी.



" चल ना काय नाटक करतोय.. " गण्या.

" अरे घरातल लग्न आहे आणि मी चुलत भाऊ बाहेर.. मला नाही जमणार तुम्ही तिघं जाऊन या ना. " प्रकाश निराशेने बोलला.

" सोड... जाऊ तर एकत्र जाऊ नाहीतर मग राहू देत. "समीर डोक पुस्तकात खुपसत बोलला.

" अरे तुम्ही एंजॉय करा ना " प्रकाश.

" सोड राहू दे " म्हणत रवीनेही आपल लक्ष पुस्तकात टाकलं.

" ए ऐका मी काय म्हणतोय. माझ्या घरापासून तीन चार किलोमीटर लांब आमचं एक जूना वाडा आहे. तिथे सध्या कोणी नसतं. आपण चौघे जाऊया ना तिथे.. मस्त मजा करू "प्रकाश चुटकी वाजवत बोलला.

" आयडीया चांगली आहे " समीर.

" मग फाइनल तिकडेच जाऊया " रवी.

ते चौघेही प्रकाशच्या स्विफ्टने गावाला आले पहिल्या दिवशी साखरपुडा पार पडला. लग्नाला अजून चार दिवस बाकी होते; म्हणून दुसऱ्या दिवशी पहाटेच त्या वाड्याकडे निघाले.



थंडीचे दिवस होते. मस्त धुके पडले होते. वाड्याच्या दरवाजातच नरू त्यांची वाट पाहत उभा होता. नरू वाड्याचा केअर टेकर, नोकर सगळंच. वाडा तसा जुन्या पद्धतीचा होता. मोठा दरवाजा, भिंतीवर प्रकाशच्या आजोबा पंजोबांचे फोटो होते. एका भिंतीवर दोन तलवारी आणि दोन खंजीर लावले होते. रवी सगळयात आधी त्या हत्यारांकडे धावला. एक खंजीर हातात घेतला त्याला आधीपासून अशा हत्यारांची आवड होती

" पक्या हा खंजीर जबरदस्त आहे रे मी घेऊ का? " रवी त्या खंजीरांकडे पाहत विचारत होता.

" नाही हा.... आजोबांचा आहे तो... ठेव " प्रकाश.

रवीने निराशेने शेवटी तो खंजीर ठेवला. पूर्ण वाडा, मागची बाग फिरेपर्यंत दहा वाजले. नंतर विहिरीवर अंघोळ करून नरूच्या हातचं गरमागरम जेवण जेऊन मस्तपैकी सगळयांनी ताणून दिली. उठेपर्यंत पाच साढ़े पाच वाजले. थोडा वेळ पत्ते वगैरे खेळून झाल्यावर जेवायची वेळ झाली. थंडी मस्त पडली होती गण्या आणि रवीला मटन खायची हुक्की आली. शनिवारचं वाड्यात खायला मनाई होती. म्हणून चौघेही मेन रोडवरच्या ढाब्यावर जायला निघाले. थंडी होती म्हणून प्रत्येकाच्या अंगावर स्वेटर, मफलर होती. थंडीत सर्वांनी मस्त गरमागरम तंदूर, कबाबवर ताव मारला. गप्पा टप्पा करत त्यांना



तिकडेच अकरा सव्वा अकरा वाजले. रात्र भरपूर झाली म्हणून ढाब्यावर तुरळक गर्दी होती. म्हणून टाइम पास करत तिकडेच बसले.

" पक्या हा ढाबा नेहमी एवढा चालतो? " गण्याने आसपास पाहत विचारलं.

"मग काय. मेन रोड आहे ना. गर्दी असते नेहमी. इथून मधून एक शॉर्टकटसुध्दा आहे. पण तिथे रात्रीचं कोणी फिरकत नाही " प्रकाश

"का रे? "

"तिथे आत्मे पिशाच्चाचा वावर असतो. " प्रकाश सहजपणे बोलून गेला.

" काय? कोण असतं? "समीरने भुवया उंचावत विचारलं.

" अरे पिशाच्च वावरतात तिथे "प्रकाश.

हा हा हा.... समीर जोरात हसू लागला.

" हसायला काय झालं? .. मी सिरीयसली बोलतोय "

" ए कोणी हसू नका सिरियस सिरियस.. हा.... मग ती काय करतात घाबरवतात, पकडतात, की सरळ मारतात. " समीर प्रकाशची थट्टा करत बोलत होता.

"हा काय मस्करी करायचा विषय आहे. "प्रकाश रागवत बोलला.



" अरे नाही. पण त्यांनी आतापर्यंत किती लोकांना मारलंय. काही रेकॉर्ड वैगरे ठेवलाय? हाफ सेंचुरी तरी झाली का? "

" मस्करी बस झाली...... सगळेच आत्मे उपद्रवी नसतात "

" हो... मग ते काय फक्त इंट्रोडक्शन देऊन निघून जातात. "

" तूझा नक्की प्रॉब्लेम काय आहे? "प्रकाश.

" अरे भूत बीत काही नसतं तुमच्या गावठी लोकांच्या कल्पना आहेत सगळ्या.. "

" मी गावठी? मग तू काय मोठ्ठा.......... "असं म्हणत तो त्याच्या रोखाने उठला गण्या आणि रवीने त्याला शांत केले.

" ठीक आहे तु माझी मस्करी करतोयस. आपण तीन दिवस इथे आहोत. तिन्ही रात्रि रात्रीचे तीन तास तू तिथे थांबायचंस. जर घाबरला नाहीस तर मी तुला काय मागशील ते देईन. " प्रकाश बोलत होता.

" बेट...? " समीर.

" हो बेट "



" मग मी पण थांबतो सम्याबरोबर पण आम्ही मागू ते देशील? रवीने प्रकाशच्या रोखाने पाहत विचारलं.

" नक्की " प्रकाश तयार झाला.

" तो खंजीर देशील? " रवीने विचारलं.

" दिला.... बेट जिंकून तर दाखव " प्रकाश

ते चौघेही गाडीने त्या रस्त्याजवळ आले. प्रकाश आणि गण्या त्या दोघांना सोडून निघुन गेले.

समीर आणि रवी थोडा वेळ तिथे थांबले रस्ता तसा शांत होता आजुबाजूला झाडी होती. थंडीचे दिवस होते म्हणून धुकं पसरल होतं. एक दीड तास दोघं गाणी ऐकत टाइम पास करू लागले.

"सम्या चल ना बाजूला जाऊन येऊया".

" बाजूला? " समीरने कानातले इअर फोन काढत विचारलं

" अरे लघवीला. थंडी भरपूर आहे "

"बरं चल "



रस्त्यापासून थोडं आत झाडीत गेल्यावर रवीला रस्त्यावरून गाडी गेल्याचा आवाज आला.

" सम्या तुला कोणत्या गाडीचा आवाज आला काय रे? "

" काय? ... चल काहीतरीच भास झाला असेल तुला "

" असेल... कदाचित "

त्या दिवशी तिथे थांबून काहीच निष्पन्न झालं नाही. दुसऱ्या दिवशीही..

प्रकाश आणि गणेश त्या दोघांना तिथे सोडून ढाब्यावर गेले.

तिथे थांबून एक दीड तास झाल्यावर त्या दोघांना गाडीचा आवाज येऊ लागला आणि त्यांच्या डोळयांसमोरून एक सफेद बॅगस्टर गाडी गेली.

" हे बघ इथून लोक आरामात जातायेत आणि पक्या बोलतो रात्रीचं कोणी फिरकत पण नाही " रवी गाडीकडे पाहत बोलला.

"अंधश्रध्दा सगळया दुसरं काय? .. सोड....... " समीर.

या दिवशीही काही निष्पन्न नाही झालं पण परत वाड्याकडे जाताना रवी आणि समीरच्या चेहऱ्यावर एक मिश्किल हसू होतं पण प्रकाशचा चेहरा मात्र हीरमूसला होता.



" काय रे सम्या कोणतंरी आपल्याला काल काय बोलत होतं? त्या रस्त्यावर भूत असतात "

" भूत नाही रे पिशाच्च, आत्मे.. "समीर रवी दोघे प्रकाशची टेर उडवत होते.

रवी :हा हा हा

" बास..... बस झाली मस्करी उद्याचा एक दिवस बाकी आहे अजून.. "प्रकाश त्यांना गप्प करत बोलला.

तिसऱ्या दिवशीही प्रकाशचा उदास होता म्हणून तो आणि गणेश वाड्यावरच थांबले होते. रवी आणि समीर दोघेच गाडी घेऊन त्या जागी आले आणि जवळच्याच एका दगडावर येऊन बसले. थंडी भरपूर होती रवीने एक सिगरेट शिलगावली आणि झुरके घेऊ लागला.

" सम्या तुझा ह्या असल्या गोष्टींवर अजिबात विश्वास नाही का रे? "

" कोणत्या? "

" आरे ह्याच आत्मे, भूताटकीच्या जागा वैगरे असतात या वर

" अजिबात नाही "



" का? "

" अरे भाकड कथा आहेत सगळया... लोकांच्या कोणती आश्चर्यकारक गोष्ट दिसली की लगेच त्याचा संबध भूताटकिशी जोडायचा "

" फॉर एग्झेंपल " रवी.

समीर बोलू लागला "आमच्या गावात एक म्हातारी होती. एकटीच राहायची. तिला सगळे चेटकीन म्हणायचे..... का माहितीय? .. तिचं घर स्मशानाजवळ होतं. तिच्या घरा बाहेर कधीकधी अस्थि वैगरे सापडायच्या. लोकांच्या मते ती जादूटोना करायची. आम्ही एकदा गावी गेलो असताना बाबांना ही गोष्ट कळली. त्यांचा अशा गोष्टींवर अजिबात विश्वास नव्हता. त्यानी या प्रकरणाचा छडा लावण्याचं ठरवलं. आणि त्यांनी तपास केला तेव्हा कळलं रात्रीच स्मशानात कोल्ह्या कुत्र्यांचा धुमाकूळ चालायचा त्यांच्या कडूनच त्या अस्थि तिच्या घरापर्यंत पोहचायच्या.... माझे बाबा होते म्हणून ती वाचली नाहीतर काही दिवसांनी गावातल्या लोकांनी तिला गावातून हाकलून पण दिलं असतं.... तू असं का विचारलंस तुला ह्या गोष्टींवर विश्वास आहे? "

" माझा विश्वास नाही. पण आई नेहमी सांगायची माझ्या मोठ्या मामाबद्दल. माझे मोठे मामा पहिलवान होते. कितीतरी कुस्ती जिंकून पंचक्रोशित नाव कमावलं होतं. एके दिवशी त्यांच्या बैलगाडीत कोणीतरी हळदी कुंकू लावलेले लिंबू सापडले. त्यानंतर काका अगदी विचित्र वागू लागले. त्यांना भयानक स्वप्नं पडू लागली. संध्याकाळ झाली की



ताप यायचा... डोळे लाल व्हायचे. खूप वैद्य केले पण अजिबात फरक नाही उलट दिवसेंदिवस त्रास अजून वाढू लागला नंतर तर त्यांनी जेवणसुध्दा बंद केलं एका खोलीच्या कोपऱ्यात अंधार करून बसून रहायचे. तब्येत पूर्ण ढासळली जराश्या आवाजाने ते घाबरायचे. आजीला हा काय प्रकार आहे ते कळलं आणि तिने काकांना ग्राम देवतेच्या मंदिरात नेऊन पूजा केली तिथेच काका बेशुध्द झाले आणि उठले ते सरळ वीस तासांनी पण त्या दिवसानंतर त्यांना पुन्हा कधी त्रास झाला नाही. त्यांच्या कोणीतरी करनी केली होती "

" म्हणजे तूझा या गोष्टींवर विश्वास आहे तर? " समीरने तोंड वाकड करत विचारलं.

" थोडा फार... "

" मग कशाला आलास इथे माझ्याबरोबर??? "

" तू तो खंजीर बघितलास ना. मला लहानपणा पासून अशा हत्यारांची आवड आहे मला काहीही करून तो हवाय "

" तू पण ना.... " समीर मान हलवत बोलला.

" चल आता तीन तास तर झाले अजून किती थांबणार निघूया चल.... " रवी बोलला.



" ह्या पक्याने भूत आहे भूत आहे म्हणून डोकं खाल्लं होतं तीन दिवस थांबलो काहीतरी होतं का? “

" मला जाऊन पहिला त्याचा चेहरा बघायचाय बेट हरेल म्हणून येताना किती उदास होता बघितलंस ना "

रवी आणि समीर गाडीत बसून वाड्याकडे यायला निघाले त्यांच्या गाडीच्या बाजूने वेगाने एक बॅगस्टर गेली.

" ही कालचीच गाडी आहे ना रे? "समीरने त्या गाडीकडे पाहत विचारलं.

" हो... तीच वाटतेय "

रवी आणि प्रकाशची गाडी आरामात त्या रस्त्यावरून चालली होती थोडं पुढे गेल्यावर दिसलं की दोन लोकं रस्त्यावर भांडत होती. एका बुलेटने त्या मगासच्या बॅगस्टर गाडीला ठोकल होतं. त्या दोघांतला एक तरुण सफेद बंडी आणि लैंगा घालून होता आणि दुसरा थोडा स्थूलसा सदरा आणि विजार घालून होता त्यांच्या भांडणाचं रुपांतर आता हाणामारीत झालं. त्या दोघांची हाणामारी बघून रवी आणि समीर दोघेही गाडीच्या बाहेर आले ह्यांच्या भांडणात पडू की नये हे त्यांना कळत नव्हतं. दोघानी एकमेकांना जमिनीवर पाडलं आणि लगेच त्या एकाने आपल्या लैंग्याच्या खिशातून चाकू काढून दुसऱ्याच्या मानेत दोनदा खुपसला चाकू घुसल्याबरोबर सदरा विजार घातलेल्याची हालचाल कमी झाली.



चाकू खुपसनारा उठून त्या एकमेकांना आपटलेल्या गाड्यांजवळ आला आणि आपली पडलेली बुलेट उचलू लागला तेव्हा तो जखमी माणूस एका हाताने मानेवरची जखम दाबून उठला. तिकडचाच जवळचा दगड उचलला आणि त्याच्या मागोमाग येऊ लागला त्या चाकू खुपसनाऱ्याने आपली बुलेट उचलली आणि तिच्यावर बसणार इतक्यात मागच्याने त्याच्या डोक्यात तो दगड घालून त्याला पाडला आणि तो बुलेटवाला मरेपर्यंत डोक्यात दगड घालतच राहिला नंतर दगड बाजूला फेकून धडपडत आपल्या गाडीजवळ येऊ लागला त्याच्या मानेतुनही भरपूर रक्त गेलं होतं त्याच्यात पुढे चालण्याचे त्राणच राहिले नव्हते तोही तोल जाऊन तिकडेच पडला. रवी आणि समीर हे सर्व पुतळयासारखं उभं राहून पाहात होते. त्यांनी पहिल्यांदाच असे खून होताना प्रत्यक्ष पाहिले होते.

" सम्या चल सटकुया इथून.. "रवी गाडीकडे जात म्हणाला.

" वेडा आहेस का? ह्यांना हॉस्पिटलला न्यायला हव. तो सदरेवाला जिवंत आहे वाटत चल बघू.. "

" मी नाही तूच जा "

समीर त्या सदरा घातलेल्याच्या जवळ आला अंगाला हात लावून पाहिलं त्याचा श्वास बंद पडला होता आणि अंगही पूर्ण थंड लागत होतं.

" अरे हा तर पूर्ण थंड पडलाय "तो रवीकडे पाहत म्हणाला.

" सोड त्याला चल सटकूया इथून "म्हणत रवी गाडीत बसला.



रवी आणि समीर दोघेही जमेल तितक्या वेगाने गाडी पळवत होते.

" माणूस मेल्यावर त्याची बॉडी थंड व्हायला वेळ लागतो त्याची बॉडी इतक्या लवकर कशी थंड पडली " समीर गाडी चालवत बोलत होता.

" त्या बद्दल काही बोलू नकोस मला भीती वाटतेय आपण घरी जाऊन बोलू "

गाडी शेवटी वाड्याजवळ आली प्रकाश आणि गणेश गाडीचा आवाज ऐकून बाहेर आले. थंडी भरपूर पडली होती तरीही समीर आणि रवी घामाने डबडबले होते. गाडीतून उतरून धावतच त्यांच्या जवळ आले.

" काय रे इतके घाबरायला काय झालं? " गण्या.

" मी बोललेलोना तिकडे नका जाऊ शेवटी घाबरलात ना "त्यांची अवस्था पाहून प्रकाश बोलला.

" अरे तिकडे भूत बीत काही नाहीये पण आम्ही जे पाहिलं ते त्याच्यापेक्षापण भयानक आहे " रवी.

" अरे त्या रस्त्यावर दोन खून झाले तेही आमच्या डोळयासमोर... "समीर

" काय खून??? " प्रकाश.

" हो खून " समीर.



" आपल्याला पोलीसांना कळवायला पाहिजे " प्रकाश.

" ए चल कशाला फालतूची झंझट.. "रवी त्याला अडवत बोलला.

" झंझट काय त्यात? ... पक्या बरोबर बोलतोय आपण पोलीसांना सांगितलं पाहिजे "समीर बोलला

"आणि इकडचे पोलीस काकांच्या ओळखीचे आहेत चला काही नाही होणार "

चौघेही चौकीत आले समोरच जमदाडे साहेब बसले होते ते त्यांना येऊन भेटले.

" हं बोला काय तक्रार आहे? "त्यांनी सर्वांकडे पाहत विचारलं

" तक्रार नाहीय " प्रकाश.

" मग? "

" दोन खून झालेत आम्ही आमच्या डोळयांनी पहिलंय " समीर

" खून..... कुठे घडलं हे? "

" त्या रस्त्यावर " समीर

" कोणत्या रस्त्यावर? "जमदाडे आवाज चढवत बोलले.



" माळावरच्या रस्त्यावर " प्रकाश.

" माळावरच्या का? बरं...... "

" हो हो त्याच " समीर.

" एकाचा खून मानेत चाकू खूपसुन आणि दुसऱ्याचा डोक्यात दगड टाकून झाला असेल?? " जमदाडे सहजपणे बोलून गेले

" हो हो " रवी.

" एका कडे बूलेट आणि दुसऱ्याकडे बॅगस्टर असेल? "

" हो अगदी बरोबर " समीर.

" एकाने बंडी आणि लँगा दुसऱ्याने सदरा विजार घातली असेल?? "

" हो अगदी बरोबर पण हे सर्व तुम्हाला कसं माहीत? आता थोड्या वेळा पूर्वी तर हे घडलंय " समीरने न राहवून विचारलं.

" सांगतो सांगतो.... ह्या खूनांचा पंचनामा मीच केला होता "

" होता..... म्हणजे? "समीरने विचारलं.



जमदाडे मागे खुर्चीत टेकून बोलू लागले. " वीस वर्षापूर्वीची गोष्ट आहे. हे दोघं काका पुतण्या होते. पण प्रॉपर्टी वरून वाद. शेवटी वेगळे झाले पण दुश्मनी संपली नव्हती. त्या दिवशी रात्री दोघांच्या गाड्या एकमेकांना आपटल्या असतील. पण एवढ्याश्या कारणा वरून भर रस्त्यात मारामारी करून एकमेकांचे मूडदे पाडले असं म्हणतात. मरतानासुध्दा ज्यांची सूडबुद्धि संपत नाय त्यांचा आत्मा असाच भटकतो. त्यांची पण दुश्मनी संपली नसेल. म्हणून ते अजूनही रात्रीचे लोकांना दिसतात. तुमच्या आधीही भरपूर लोकांना दिसलेत. म्हणून तिथे रात्रीचं कोणी फिरकत नाही "

आता मात्र प्रकाशच्या चेहऱ्यावर मिश्किल हसू दिसत होतं कारण तो बेट जिंकला होता. समीरला त्याच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं त्या माणसाची बॉडी इतक्या लवकर थंड कशी झाली...



# शिकार

आजही अगदी कडाक्याची थंडी पडली होती. दूरवर कुठेतरी कुत्र्याच्या विव्हळण्याचा आवाज येत होता. पिंपळाच्या झाडावर बसून घुबड चेकाळत होतं. पण जंगल मात्र शांत होतं... कदाचित नव्या शिकारीसाठी.

जंगलातल्या रस्त्याच्या मधोमध एक सफेद गाडी उभी होती. पुढचा टायर पंक्चर झाल्याने पुढे जायची शक्यताच नव्हती. गाडीच्या बाजूला एक तरुण मुलगी उभी होती. स्नेहा तिचं नाव. लाल पंजाबी ड्रेस, निळेशार डोळे, गोरापाण वर्ण, कानात झुमके, कपाळावर छोटीशी टिकली. थंड वाऱ्यावर हलकेच उडणारे केस. ती रस्त्यावर उभी राहून वाट बघत होती कोणाच्यातरी लिफ्टची. पण कितीतरी वेळ कोणीच आलं नव्हतं. गेले काही दिवस जंगलातील वर्दळ कमी झाली होती. काही लोकांच्या मते जंगलात म्हाताऱ्याचं भूत दिसत होतं. काहींच्या मते तो पांडबाचा आत्मा होता तो. तसंच जंगलात आक्सिडेंट ही वाढले होते. त्यामुळे लोकांचं येणंजाणं कमी झालं होतं. त्यामुळे तिला आता लिफ्ट मिळणे कठिण होतं. भरपूर वेळाने अचानक अंधारातून गाडीचा आवाज येऊ लागला. आणि दूरवर दोन हेड लाइट दिसू लागल्या. अंधार कापत एक लाल सुमो स्नेहाजवळ येऊन उभी राहिली. आत एक स्थूल म्हातारा माणूस बसला होता. जोरात गाणी चालू होती. कदाचित हिला लिफ्ट हवी कळली असावी म्हणून त्याने थांबविली असेल. इतक्या सुनसान जंगलात



अचानक एखादी गाडी येऊन थांबणे म्हणजे स्नेहासाठी नवलच होते. पण काय करावे हे तिला कळत नव्हते. तेवढ्यात" गाडीत बसायचंय का? तर बस नाहीतर मी जातो "असा घोगरा आणि उर्मट आवाज आला. ती थोडी घुटमळली.

शेवटी नाईलाजाने ती तयार झाली आणि बॅग घेऊन बसायला जाणार तेवढ्यात तिचे लक्ष ड्रायव्हरच्या बाजूच्या सीटवर गेले तिथे लांब सुरा आणि एक मोठी बंदूक होती हे पाहून तर स्नेहा दचकून मागे सरकली. पुढे जायची कदाचित तिची हिम्मत होत नसावी. पण अजून काही पर्याय ही नव्हता. इतक्या रात्री सुनसान जंगलात असं उभं राहणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा होता. कधी काय होईल सांगता येत नव्हतं. त्यात गाडी मिळण्याची शक्यता नव्हती. शेवटी नाईलाजाने स्नेहा गाडीत मागच्या सीटवर बसली. गाडीत बसताच एक मांसाचा वास नाकात शिरला. गाडीच्या सीट वर लाल डाग पडले होते कदाचित रक्ताचे असतील.??? ....... तिने लगेच हा विचार झटकुन टाकला.

गाडी सुरू झाली. गाडी रस्त्यावरून मधे मधे धक्के खात जात होती. जुना रस्ता होता हे स्पष्ट जाणवत होतं. तो म्हातारा एकटक समोर बघून अगदी यंत्रासारखा गाडी चालवत होता. गाडीत अजूनही तो मांसाचा वास भरून राहिला होता उलट अजून वाढला होता. आजुबाजुला एकही वाहन दिसत नव्हतं. सगळी कडे सुनसान होतं. तिने न राहून शेवटी विचारलंच. " काय हो हे जंगल असंच सुनसान असतं का? "समोरून काहीच उत्तर नाही. तो म्हातारा अजूनही एकटक गाडी चालवत होता.



"अहो बाबा इकडे रहदारी का नाही? तीने विचारलं

"रामा... रामा नाव माझ.. "अशाच उर्मट उत्तराची अपेक्षा होती आणि ते आलं....

. " अहो पण हा रस्ता असाच सुनसान असतो? स्नेहा खिडकीतून बाहेर पाहत बोलली.

" हिकड आधी लई लोक यायची फिरायला. शहरात जायला तर हा शॉर्टकट होता. पण मधी अशा गोष्टी घडल्या आणि लोक इथं फिरकायचे बंद झाले "रामा गाडी चालवत बोलत होता.

" पण असं काय झालं होतं? स्नेहाने विचारलं.

त्याने सांगायला सुरुवात केली " ह्या रस्त्याने आधी भरपूर लोक यायची जायची. जंगलच होतं म्हणून काही हींडायला, फिरायला, शिकारीला बी यायची. इथंच येक पांडबा नावाचा म्हातारा आन त्याचं बिऱ्हाड रहायचं. त्याचा ढाबा होता जंगलात येकच चांगलं खायचं ठिकाण. तवा हिकडचे रस्ते माणसांनी भरलेले असायचे. पण नंतर नंतर इथं लय मेलेली जनावर मिळाया लागली दिवसे दिवस हे वाढू लागलं. इथं जनावरांच्या चामड़ीची तस्करी सुरू झाली. पयलं पयलं कोणाला काहीच कळत नव्हतं. मोठी टोळी व्हती आन पोलीस बिचारे पकडून कोणाला पकडनार? टोळी भरपूर मोठी होती...



पण पांडबाला या होणाऱ्या गोष्टीचं फार वाईट वाटत होतं. जंगलातच वाढला होता ना! जनावर अशी मरताना कसा बघणार. एके दिवशी रात्री एक ट्रक आणि दोन गाड्या त्याच्या ढाब्यासमोर येऊन थांबल्या आन काही माणसं उतरली. त्याच्या ढाब्यावर जेवायला. तेवढ्यात पांडबाला काही दिसलं त्यांच्या कपड्यांवर रगताचे डाग होते. म्हणून पांडबाला संशय आला. म्हणून त्यांची नजर चुकवून त्याने ट्रकमधी पाहिलं तर आत नुकतीच कापलेली जनावरांची चामडी होती. त्याला जे समजायचं होतं ते समजला. आणि त्याने त्यांच्या जेवणात गुंगीचं औषध टाकून त्यांना दिलं आणि बेशुध्द केलं. नंतर पोलीसांना बोलवून त्यांना पकडून दिलं. पण त्याचे परिणाम शेवटी त्याने भोगलेच. त्यांनी त्याच्या ढाब्याला आग लावून दिली त्यातच त्याच्या सम्पूर्ण बिऱ्हाडाला जाळून टाकलं. "

" पण मग काही पोलीस चौकशी वैगरे नाही झाली? "कावेरीने आश्चर्याने विचारलं

" झाली ना.. त्याची पोरगी होती ना तिचं सासर शहरात होतं चांगली शिकलेली होती म्हणे.. ती आली होती कंपलेंट करायला..... पण तिचं नंतर काही झालं कोणालाच कळलं नाही तिलाबी मारलं असलं "

" पण असं ऐकलंय की पांडबाचं भूत सगळ्यांना दिसतं. त्यानेच त्या तस्कराना मारलंय. "कावेरीने शंका बोलून दाखवली



" हाहाहा ही अफवा म्याच पसरवली होती. ते तस्कर दुसरं तिसरं कोण नसून आम्हीच आहे "

" तुम्हाला भीती नाही वाटत?

" मला कशाची भीती? त्या पांडबाला आम्हीच मारलं. तो जिवंत असताना माझं काही वाकड नाही करू शकला. मेल्यावर काय करणार? रामा बेफीकीरीने बोलत होता.

" पण असं ऐकलंय की तुमच्या म्होरक्याला त्यानेच मारलंय?

" आमचा म्होरक्याला तो कुटे मारणार? त्याचा गळा तर मीच चिरला होता "रामा मिश्किलपणे बोलत होता.

का? तिने विचारलं

"मेहनत करायची आम्ही! पैसे लाटनार तो. टाकला मारून... लोकांना वाटलं पांडबाच्या भूताने मारलं.

"म्हणजे तुम्हाला भीती नाही वाटत?



"हाहाहा!!! भीती वाटत असली तर आलो असतो का चामड़ी न्यायला " रामा पुढे पाहत हसत हसत बोलत होता.

तेवढ्यात तिचं लक्ष मागे गेलं मघापासून अंधारात काय होतं ते आता दिसलं एक दोन मारलेली जनावर पडली होती. ते मघासचे रक्ताचे डाग कसले आहेत हे आता स्नेहाच्या लक्षात येत होतं.

" पण मी तर ऐकलंय की मागच्याच आठवड्यात एका तस्करांच्या टोळीची हत्या झाली. ती हत्या होती की कोणत्या प्राण्यांने हल्ला केला ते अजून कळलं नाही. "

" हम्म तेच तर कळत नाही ना जर खून म्हणावा तर ज्याने केला तो नीटही करू शकला असता पण नाय त्यांचे डोळे फोडले होते... गळा चिरला होता. असा हल्ला कोणी जनावर पण करत नाय. " रामा एका हाताने दाढी खाजवत बोलला.

"ते खून पांडबाच्याच्या मुलीने केले "स्नेहा बोलली.

" काय? ....... कसं काय?

"जेव्हा पांडबाचा खून झाला तेव्हा ती आली होती तक्रार करायला पण त्या लोकानी तिलाही मारून टाकलं. "

" पण हे सर्व तुला कसं माहीत?" रामाने विचारलं.



इतक्यात एक कूबट वास त्याच्या नाकात शिरला.

" कारण.......... ती मीच आहे...... कावेरी बोलली तिचा आवाज मगास पेक्षा वेगळा येत होता तो घोगरा झाला होता. म्हणून रामाने आरशातून मागे पाहिलं तर तिकडे मघाशी जी मुलगी होती तिच्या जागी आता वेगळंच काही होतं. चेहऱ्यावरचा अर्धा भाग कापलेला होता त्यामुळे एकच डोळा दिसत होता एक डोळा फुटला होता डावीकडून जबडा कापलेला होता. त्यामुळे दात दिसत होते. गळयावर दोन चाकुच्या खूणा दिसत होत्या त्यातून रक्त गळत होतं ते बघून रामाचा थरकाप उडाला गाडी वरचं नियंत्रण सुटू लागलं गाडी वेडी वाकडी वळण घेत चालू लागली. तिचा एक हाथ पुढे आला आणि त्याचा पंजा रामाच्या गळयावर आला आणि पाच नखे रामाच्या मानेत घुसली रामाच्या तोंडातून शेवटची किंकाळी निघाली आणि गाडी अंधारात पुढे जाऊन झाडाला धडाकली.

आजही कडाक्याची थंडी होती दूरवर कुत्री विव्हळत होती. आज पुन्हा जंगलात एक सफेद गाडी उभी होती आणि बाजूला एक मुलगी वाट पहात होती..... कदाचित नव्या "शिकारीची"



# चकवा...

आज रमाकांतला भरपूरच उशीर झाला होता. पोस्टमन म्हणून कामाला लागल्यापासून सुरवातीचे काही महीने ठीक गेले. पण नंतर दुर्गम खेड्यात जावं लागल्यावर मात्र उशीर व्हायचा. त्यात आज सकाळी निघायलाच उशीर झाला. दिवसभर फिरुन संध्याकाळी वेतोबाच्या देवळात जाऊन घरी यायला निघाला. आईची शिकवण "कामासाठी खय खय फिरतसं देवाचो अंगारों जवळ ठेवत जा.. त्यामुळे देवळात जायची सवयच लागली. त्यात "दुष्काळात तेरावा महीना "म्हणून आज सायकल खराब झाली. ती रिपेर करायला पांडूच्या गॅरेजमधे टाकायला गेला तर तो ही गॅरेज बंद करून निघाला होता. शेवटी सायकल त्याच्या कडेच ठेऊन एस. टी स्टॅण्डपर्यंत पायीच निघाला. शेवटची एस. टी. मिळाली तर नशीब. नाही तर तालुक्यापर्यंत चालत जावं लागणार होतं. पंचवीस मिनीट झाली रमाकांत चालत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोकळी शेतजमीन, दूरवर घरे आणि त्यातून येणारा मीनमीनता प्रकाश दिसत होता. त्यात आज अमावस्या होती म्हणून चंद्र



नव्हता. त्यामुळे सम्पूर्ण रस्ता अंधारात. तरी पांडूने एक छोटी बॅटरी दिली म्हणून चालण्यापूरता तरी प्रकाश होता. इतक्या पायपीटनंतर शेवटी एस. टी स्टॅण्ड आला. पण शेवटची एस. टी. निघून गेल्याची शक्यता होती. एस. टी. स्टॅण्ड वर अंधारात थांबण्यात काही अर्थ नव्हता. त्या पेक्षा त्याच रस्त्याने चालत तालुक्यापर्यंत गेलं तर रहायची काही सोय होईल आणि एस. टी. गेली नसेल तर वाटेत भेटेलही. असे समजून तो पुढेच निघाला. आता मात्र रस्त्याच्या आजूबाजूला कोठेही शेतजमीन किंवा घरं नव्हती हा रस्ता जंगलातून जात होता. त्यामुळे फक्त गर्द झाडी, बॅटरीचा थोडा प्रकाश, बाकी अंधार आणि रात किड्याचा किर्र किर्र आवाज येत होता. बाकी नीरव शांतता...

आता मात्र रमाकांतला भीती वाटायला लागली. त्याच्या शिवाय रस्त्यावर दूर दूरपर्यंत कोणीही दिसत नव्हतं. त्यात त्या पांडूने घाबरवलं होतं. "मालकानू त्या एस. टी. च्या वाटेसुन जाऊ नका. थय चकवो लागता... चकवो "

चकवा म्हणजे काय रमाकांतला चांगलीच कल्पना होती. रात्रीच्या वेळी काही ठिकाणी दुष्ट शक्तींचा वावर असतो. त्या आपल्याला रात्र भर एकाच जागी खेळवतात. आणि दिवस होण्या आधी मारून टाकतात. हळु हळु ती रस्त्यावरची शांतता रमाकांत मनात भीती करू लागली होती की हळु हळु आपल्या मागून कोणाच्या तरी चालण्याचा आवाज येईल, बाजूच्या झाडीतून अंधारातून अचानक कोणीतरी समोर येईल, आजुबाजूने घुंगरांचा आवाज येईल.



शेवटी सगळे विचार झटकून रमाकांत पटापट पावलं टाकू लागला. पुल लागला. खाली ओढा वाहत होता. पाणी कमी होतं पण खोल होता. त्या पाण्याचा आवाज थोडा बरा वाटला. थोडं पुढे चालत गेल्यावर त्याचं लक्ष सहज बाजूला गेलं तिथे एक मोठं पार असलेल पिंपळाचं झाड होतं. हे पाहून त्याला काही तरी आठवलं. म्हणून तो जरा जवळ जाऊन पाहू लागला तर हे तेच पिंपळाचं होतं जे काही वेळा पूर्वी पहिलं होतं. पुन्हा फिरुन तेच झाड हा चकव्याचा प्रकार वाटत होता. म्हणून त्याने जवळचा दगड घेऊन त्या झाडाखाली ठेवला. आणि त्याच्या बाजूला जमिनीवर छोट्या दगडाने एक फूली काढली. आणि पटापट पावलं टाकत जवळ जवळ धावतच पुढे जाऊ लागला. का

ही अंतरावर गेल्यावर पुन्हा तसाच पुल आला आणि थोड्या वेळाने पुढे गेल्यावर पुन्हा तेच झाड दिसू लागलं आणि त्या खाली तोच दगड होता. आता मात्र त्याची खात्री झाली हा चकवाच आहे तरी मनाचं समाधान म्हणून एकदा जवळ जाऊन ती फूली पाहाविशि वाटली जी मघाशी केलेली.. आणि जवळ जाऊन पहिलं तर तिचं फूली तोच दगड आणि झाडही तेच होतं. ते पाहून रमाकांत घाबरुन जीव घेऊन पळत सुटला. हातातली बॅटरी कधी पडली ते सुध्दा कळलं नाही. पण आता जीव वाचवायचा असेल तर फक्त पळायचं एवढंच रमाकांतला कळत होतं.

पळून पळून शेवटी दम लागला तेंव्हा गुढ्ग्यावर हात ठेऊन तो दम खाऊ लागला शर्ट घामाने भिजलं होतं श्वास जोरात चालू होता आणि समोर फक्त अंधारात ते झाड दिसत होतं आणि मृत्यूही.... ते पाहून शेवटी भीतीने, निराशेने रमाकांत गुढ्ग्यावर



जमिनीवर बसला आणि डोळे मिटनार इतक्यात घूर्र घूर्र आवाज येऊ लागला हा आवाज तर एस. टी. चा होता त्याच्या चेहऱ्यावर किंचित हसू उमटल मागे पहिलं तर रस्त्याच्या अंधार कापत एस. टी. च्या दोन हेड लाईट त्याच्या दिशेने येत होत्या... ती समोरून येणारी एस. टी. पाहून त्याच्या जीवात जीव आला. आता मात्र हा चकवा आपलं काही करू शकत नाही अशी खात्री झाली. आणि तो उत्साहाने उठून एस. टी. ला हात दाखवू लागला. एस. टी. समोर येऊन थांबली त्या पिंपळाकडे एक तिरपा कटाक्ष टाकून त्याने स्वतःला आत सारलं. आणि थेट जाऊन मागच्या सीटवर खिडकीकडे जाऊन बसला.

एस. टी. सुरू झाली. इतक्या वेळाच्या शांतते नंतर एस. टी. च्या खिडकीचा तो खड़खड़ आवाज त्याला सुखद वाटत होता. आणि खिडकीतून थंड वारा लागत होता. म्हणून काही वेळ डोळे बंद करून मस्त पडुन राहिला. नंतर विचार चमकून गेला इतका वेळ झाला कोणी तिकीट मागायला कोणी कसं आलं नाही? म्हणून जरा डोळे उघडून आजुबाजूला बघितलं. बाजूला एक म्हातारा बारीकसा, सफेद शर्ट, सफेद धोतर, खुरटी दाढी तो एकटक रमाकांतकडेच पाहत होता. त्याने थोडं बाजूला होऊन पुढे पहिलं तर सर्वात पुढच्या सीटवर कंडक्टर बसला होता. आणि बसही माणसांनी पूर्ण भरली होती तो पुन्हा खिडकीकडे सरकला. तो बाजूचा म्हातारा अजूनही रमाकांतकडे त्याच नजरेने पाहत होता त्याच्याकडे दुर्लक्ष करून रमाकांत बाहेर पाहू लागला. त्याला कळत नव्हतं इतक्या ही इतकी उशीराची एस. टी. असूनही इतकी गर्दी कशी आहे.



एस. टी. धावत होती झाड मागे जात होती. पण नक्की कुठंपर्यंत आलोय हे मात्र कळत नव्हतं म्हणून जरा विचारून पहावं म्हणून जरा मधे सरकून पुढे पहिलं तर पुढच्या दोन तीन सीट वरची लोक वळून त्याच्या रोखानेच पाहत होती. तो बाजूचा म्हातारा अजून तसाच एकटक पाहत होता. त्यांच्याकडे न बघता नजर वळवून रमाकांत खिडकीतून बाहेर पाहू लागला. ही लोकं असे का पाहत आहेत हे मात्र त्याला कळत नव्हतं थोडा वेळ बाहेर पाहून ते लोक अजूनही आपल्याकडे पाहत आहे का? हे बघण्यासाठी त्याने डोळयाच्या कोपऱ्यातून पहिलं तर आता बसमधली जवळ जवळ सर्व लोक त्याच्याकडेच पाहत होती एकटक... त्या सर्वांचं असं बघणं रमाकांतला असह्य होऊ लागलं. कधी एकदा तालुक्याचा स्टॉप येतोय आणि आपण उतरतोय असं त्याला वाटू लागलं. म्हणून तो बाहेर पाहून अंदाज घेऊ लागला. पण अंधार जास्त होता म्हणून नक्की कुठंपर्यंत पोहचलोय कळत नव्हतं. किती वाजलेत तेही माहीत नव्हतं.

इतक्यात त्याला आठवलं त्याचं पट्टा तुटलेल घड्याळ खांद्यावरच्या पिशवीत आहे. त्या पिशवीत तो घड्याळ शोधू लागला शेवटी हाताला लागलंच अंधार असल्याने वेळ दिसत नव्हती नीट निरखून बघितल्यावर दिसलं की रात्रीचा एक वाजला होता. आता मात्र त्याचं डोक गरगरायला लागलं. गावची शेवटची एस. टी. तर साढ़े दहाची असते आणि दूसरी कोणती एस. टी. तर इथून जात नाही मग एक वाजता आपण कोणत्या एस. टी. मधे बसलोय?



आता त्याचं लक्ष पुढे गेलं. तर पुढच्या सीटवरचे काही लोक आता त्याच्याकडे बघत उठून उभे राहिले होते. आता हा सर्व प्रकार त्याच्या लक्षात आला की आपण या चकव्यातून निसटलो नाही उलट अजून अडकलोय. हळु हळु बसमधली एकेक माणस उठून उभी राहत होती त्याच्याकडेच एकटक बघत डोळे अगदी सताड उघडे.. आता यातून वाचण्याची काहीच शक्यता नव्हती मघाशी रस्त्याने तरी पळू शकत होता पण आता या बसमधे पूर्ण अडकला होता. ती माणस हळुहळु जवळ येऊ लागली त्याचा श्वास जोरात चालू लागला ह्रुदयाची धडधड वाढली रमाकांतकडे आता या सर्वाचा सामना करण्याची अजिबात ताकद रहिली नव्हती आणि त्या सर्वाना पहायचीही म्हणून रमाकांतने डोळे बंद करून डोके मागे टेकले. दोन सेकंदानी त्याच्या लक्षात आले मघासपासून तो खड़खड़ आवाज फक्त बाजूच्या खिडकीचा येत नव्हता कदाचित मागची खिडकीही उघडी होती म्हणून लगेच त्याने डोळे उघडून मागे पहिले तर खरच मागची खिडकी उघडी होती. आता समोर पहिलं तर सगळी मानस त्याच्यापासून जवळ जवळ तीन फूटावर उभी होती. सफेदसे चेहरे, कोरडे ओठ.. आणि आता तो जवळचा म्हातारा हळुहळु त्याच्याजवळ सरकू लागला त्याचा हात रमाकांतवर पडणार इतक्यात रमाकांतने सगळी ताकद ऐकटवून बसमधून उडी मारली.

थोडं कोपराला आणि कपाळाला जखम झाली पण तो उठून पुन्हा उभा राहिला. बस थोडी पुढे जाऊन थांबली. रमाकांत त्या बसच्या बाजूने धावत पुढे जाऊ लागला बसमधली माणस खिडकीतून त्याच्याकडेच पाहत होती. काहीही करून त्याला एस. टी. पासून लांब जायचं होतं त्यामुळे तो न थांबता फक्त धावतच होता थोडा वेळ



पळाल्यानंतर मागे वळून पहिलं तर एस. टी. दिसत नव्हती म्हणून थोडा वेळ थांबून दम खाऊ लागला पण थांबण्यात अर्थ नव्हता कारण ती एस. टी. कधीही मागून येऊ शकत होती. इतक्यात समोरुन एक गाडी येताना दिसली नीट बघितलं तर ती जीप होती. रमाकांत तिच्या दिशेने धावू लागला.

रमाकांत जीपच्या दिशेने धावू लागला दोन्ही हात हलवत जीप समोर जाऊन उभा राहिला. जीप त्याला बघून थांबली. तो जीपच्या ड्राइवरकडे जाऊन जीपमधे घेण्याची विनंती करू लागला. जीप चालवणारा माणूस निळा शर्ट, काळी पँट, मिश्या असा काहीसा होता त्याच्या बाजूला स्थूलसा, सफेद सदरा घातलेला केस पिकलेला म्हातारा माणूस होता मागे एक म्हातारी लुगड नेसलेली बाई, तिच्या बाजूला दोन साडी नेसलेल्या स्त्रिया आणि समोर एक तरुण माणूस बसला होता गावातलच कुटुंब होतं कदाचित. जीप चालवणाऱ्याने हातानेच आत यायची खूण केली. रमाकांत लगेच आत मागून आत जाऊन बसला. आत जाऊन डोकं मागे ठेऊन दम खाऊ लागला जीप चालत होती. पिशवीतून घड्याळ काढून बघितलं त्यात दोन वाजले होते. सकाळ व्हायला अजून फार वेळ होता. घड्याळ तसंच पिशवीत ठेऊन तो बाहेर पाहू लागला थोडा वेळ बाहेर पाहिल्यावर त्याच्या लक्षात आलं आपण तालुक्यापासून अजून दूर चाललोय मघाशी घाई घाईत आपण धावत जीपमधे चढलो पण जीप तर उलट्या दिशेने जात होती भीतीमुळे लक्षातच नाही आलं. ही लोक नक्की



जातायेत कुठे हे विचारावं म्हणून जीप चालवणाऱ्याकडे पहिलं तर त्याच्यात काही तरी वेगळं वाटलं त्याने पुन्हा एकदा बघितलं तर तसंच काहीतरी विसंगत वाटत होतं.

रमाकांतला गाडी चालवण्याचा अनुभव नव्हता पण काही तरी नक्की होतं जे खट्कट होतं म्हणून त्याने पुन्हा एकदा निरखून पहिलं तेव्हा त्याच्या डोक्यात प्रकाश पडला जीप चालवणाऱ्याचे दोन्ही हात स्टेअरिंग वर होते पण ते अजिबात हलत नव्हते गाडी सुसाट रस्त्यामधून वळण घेत, ब्रेक मारत चालली होती पण जीप चालवणाऱ्याची तर काहीच हालचाल दिसत नव्हती तो पुतळयासारखा स्तब्ध होता इतक्यात त्याचं लक्ष समोर गेलं समोरच्या त्या तिन्ही बायका तशाच स्तब्ध होत्या कोणती हालचाल नाही काय नाही आणि त्याच्याच रोखाने पाहत होत्या. अगदी अगदी मघासच्या एस. टी. तल्या लोकांसारख्या. त्याला हे समजायला वेळ नाही लागला "आगी तून सुटून फुफत्याट पडलोय".

आता हे मनाशी पक्क झालं होतं की या चकव्यातून सुटका नाही. त्याने समोर पहिलं तर जीपच्या लाइटच्या प्रकाशात ते मघासचचं पिंपळाचं झाड जवळ येताना दिसत होतं आणि त्या पासून थोडं मागे अंतरावर ती एस. टी. उभी दिसत होती. आता मात्र हे सगळंच संपलं अशी शक्यता वाटत होती. आता जीपने ओढा असलेला पूल ओलांडला ते पिंपळाचं झाड आणि एस. टी. जवळ येऊ लागली इतक्यात त्याच्या लक्षात आलं की हाच ओढा पुढे वेतोबाच्या देवळाजवळून जातो ह्याच्या बाजूने जात राहिलो तर देवळाजवळ नक्की



पोहचू आणि तिथे पोचलो तर हा चकवा आपल्याला काही करू शकत नाही. क्षणाचाही विलंब न करता रमाकांतने जीपमधून उडी मारली.

ती जीप पुढे जाऊन थांबली आणि काही अंतरावर एस. टी. होती तो उठून अगदी जीव घेऊन त्या रस्ता सोडून ओढ्याकडे पळू लागला. पण रस्त्यात कुठेतरी पाय अडखळला आणि सरळ तोंडावर आपटला तसाच जमिनीवर पलटी होऊन पडला डोळयांसमोर झाडाच्या फांद्या दिसत होत्या हळूहळू ती बसमधली आणि जीपमधली माणसं एक एक करून त्याच्या भोवती गोळा व्हायला लागली तेच भयानक चेहरे आणि एकटक रोखलेली नजर. हळूहळू त्याची शुध्द हरपू लागली आणि फक्त अंधार दिसू लागला.

रमाकांतने डोळे उघडले त्याच्या तोंडावर कोणीतरी पाणी शिंपडट होतं. सकाळ झाली होती आजुबाजुला लोक दिसत होती गावचा पोस्टमन असल्याने सगळयांच्या ओळखीचा होता त्याला असं पडलेल पाहून लोक जमा झाली एका दोघांनी त्याला उठवून बसवलं आणि काय झालं ते विचारू लागले. रमाकांतने रात्रभर जे जे पहिलं ते सर्व सांगितल. ते सर्व ऐकून एक वयस्कर माणूस पुढे आला आणि बोलू लागला.

"आरे बाळा हयसर दोन वर्षा पूर्वी एस. टी. आणि जीपचो अक्सिडंट झालो होतो. एस. टी. जीपला चीरडुन ओढ्यात पडली ओढो खोल असा त्यात पाऊस होतो पाण्याने भरलेल्या ओढ्यातसुन त्या एस. टी. तला कोनबी वाचला नाय तवापासून हयसर चकवो लागता आण अमावसेक कोण गावला तर सकाळी ह्या ओढ्यात मेलेला दिसता काल



पण अमावस होती तू कसो काय वाचलस देवाक माहीत? " रमाकांत उठून चालू लागला आजूबाजूचे लोक त्याच्या कडे पाहून असंच कुजबुजत होते. "आजपातूर कोनबी नाय वाचला ह्यो मेलो कसो काय जीतो हा कळणा नाय? "

आपण ह्यातून का वाचलो हे त्याला थोडं थोडं कळायला लागलं आणि कानात आईचे शब्द घुमत होते "कामासाठी खय खय फिरतसं देवाचो अंगारों जवळ ठेवत जा....... अंगारों जवळ ठेवत जा.. "





# सर्पबळी

आज एका महिन्यानंतर त्या बंगल्यासमोर एक सफेद बॅगस्टर गाडी येऊन थांबली त्यातून एक इसम उतरला. इन केलेला पांढराशुभ्र इस्त्रीचा शर्ट, काळी पँट, चकचकीत बूट, भरदार मिश्या असा काहीसा रुबाब.... त्याला पाहून गणपा बाहेर आला.

"माफ करा सायेब जरा उशीरच झाला गाडी पाठवायला "गणपा बोलला.

"जरा उशीर? दहा मिनटं वाट पहात होतो मी.. वेळेचं भान बाळगा जरा चला. उचला ते सामान" धारदार आवाज घुमला. त्यांच्या पाठोपाठ गणपा ती बॅग घेऊन आत आला. ते अधिकारी बदली होऊन या बंगल्यात आले होते.

किती तरी दिवसांनी हा बंगला उघडत होता. बंगला तसा छोटा होता. पण ऐसपैस होता. दरवाजा समोर मोठा हॉल, मधोमध डायनिंग टेबल त्यापुढे किचन उजव्या बाजूला जीना, वरती दोन बेडरूम. गणपा ने सगळ आवरल होतं. पण कोणत्याही गोष्टीतून चुका काढण्याची चव्हाणांची सवय जाणार होती? शेवटी कपाटावरुन गणपाला ओरडा



भेटलाच. दुसऱ्या दिवशीपासून ते ऑफिसला जाणार होते. म्हणून आजच सगळी आवरा आवर करून मोकळे झाले.

दुपारच्या जेवणानंतर एक चांगली झोप झाली त्यामुळे थकवा दूर झाला. संध्याकाळी गणपाने दिलेला चहा पीत कादंबरी वाचता वाचता कसा वेळ गेला कळलंच नाही. खिडकीतून पाहिल तर अंधार पडला होता. थंडी थोडी वाढली होती. अजून एक चहा प्यायची तलप आली म्हणून गणपाला हाक मारली. तर हू नाही का चु नाही. अजून दोन तीन हाका मारल्या. पण काहीच प्रतिसाद नाही. हे पाहून रागाने चव्हाण रूमच्या बाहेर आले जीना उतरून खाली आले. तर गणपा किचनमध्येही नव्हता सगळा बंगला फिरले. पण कुठेच नाही. म्हणून बाहेर आले तर चौकीदाराने सांगितल की गणपा मघाशिच गेला. हे ऐकून चव्हाणांना थोडा राग आलाच.

"असा कसा गेला? काही विचारणं नाही.. सांगणं नाही... बेशिस्त भरलेत सगळे " असे काही बडबडत किचन मधे आले. तर किचनमधे सर्व स्वयंपाक गणपाने करून ठेवला होता. हे पाहून थोडा राग शांत झाला. बंगल्यात थोड्या फेऱ्या मारून ते जेवायला बसले. स्वःतची कामं स्वतः करायची त्यांना सवय होती. कारण कामानिमित्त इतक्या ठिकाणी बदल्या झाल्या होत्या की ही सवय लागूनच गेलेली होती. रात्री भांडी बेसिनमधे टाकली आणि रूमकडे जायला जिना चढणार तेवढ्यात किचनमधून काही तरी खसखसण्याचा आवाज आला. दोन सेकंद थांबून चव्हाण ते ऐकू लागले. नंतर दुर्लक्ष करून



पुढची पायरी चढणार तेवढ्यात पुन्हा तोच आवाज आणि त्यानंतर कोणतं तरी भांड पडल्याचा आवाज आला. ते पाहण्यासाठी पुन्हा जीना उतरून किचनमधे गेले. आणि लाइट लावली तर तिथे एक तांब्या पडला होता. खिडक्या बंद होत्या तरी पण हा तांब्या कसा पडला हे त्यांना कळत नव्हतं. तो परत ओट्यावर ठेऊन ते रूममधे आले.

रूमचा दरवाजा बंद केल्या केल्या पुन्हा तोच सरपटण्याचा आवाज दरवाजा बाहेरून आला. म्हणून दरवाजा उघडून बघितलं तर बाहेर काहीच नव्हतं शेवटी दरवाजा बंद करून ते झोपायला गेले झोपही लगेच लागली. रात्री अधून मधून दरवाज्याच्या बाहेरून आवाज येत होते पण प्रवासाच्या थकव्याने झोप एवढी आली होती की बाहेर काय चाललंय हे बघायला कंटाळा आलेला. सकाळी गणपाच्या दरवाजा ठोठावल्याने जाग आली. फ्रेश होऊन खाली आले तर नाश्ता टेबलावर तयार होता.

"काय रे गणपा रात्री कुठे होतास... जाण्यापूर्वी सांगता येत नव्हतं "

"नाही मालक काल जेवणं बनवायला लय येळ लागला अंधार पडतच आला होता म्हणून लगीच गेलो "

" ठीक आहे पण आज रात्रीपासून थांबत जा "

" मालक तेवढं सोडून काय बी बोला "

" का? "



" म्हण्जे ते... ते... माझी बायको आजारी असते ना म्हणून "

" बरं पण जेवण बनवूनच निघ.. "

शेवटी नाश्ता वैगरे करून चव्हाण ऑफिसला गेले

ऑफ़िसमध्ये चांगलं स्वागत केलं गेल्या गेल्या मस्त एक चहा मागवली चहा घेऊन येताना आणि ठेऊन जाताना शिपाई एका वेगळयाच नजरेने त्यांच्याकडे पाहत गेला रिकामा कप घ्यायला त्यानी पुन्हा त्याला बोलावलं तेव्हा शिपायाने विचारलं "सायेब काल झोप चांगली लागली ना?

" का? नाही त्या बंगल्यात झोप चांगली लागत नाही "

" म्हणजे? "

" नाही काही नाही सहजच " असं त्यांना टाळत तो निघून गेला.

आज दिवस तसा चांगला गेला ते घरी आले तर गणपा जेवण बनवून केव्हाच गेलेला होता. जेवण घेऊन टेबलावर जेवायला बसणार तेवढ्यात कोणीतरी सरपटत किचनमधे जाण्याचा आवाज आला. म्हणून जेवण तिथेच सोडून ते किचनमधे बघायला गेले तर तिथे काहीच नव्हतं. कोणीतरी मांजर वैगरे असेल म्हणून ओट्याखाली वैगरे नीट



बघितलं तर तिथेही काही नाही. म्हणून किचनची खिडकी पुर्ण बंद करून जेवायला बसले. तेव्हा पाहिलं तर खिरीचा रंग निळा पडला होता. सगळी खीर खराब झाली होती. हे सगळ काय चाललंय त्यांना कळत नव्हतं. शेवटी बाकीचं जेवण जेऊन झोपायला गेले.

डोळा लागतो न लागतो तेवढ्यात पुन्हा तो सरपटण्याचा आवाज... ते जे काही होतं ते खाली पूर्ण हॉलभर सरपटत फिरत होतं. झोप डोळयावर होती तरी जे काही होतं ते बघायला चव्हाण शेवटी खाली आले लाइट लावली तर हॉलमधे काही नव्हतं सगळे कोपरे शोधले पण काही भेटल नाही. शेवटी एक चांगली जांभइ देऊन ते परत झोपायला गेले.

सकाळी ब्रेकफास्टला आले तर गणपा ब्रेकफास्ट लावत होता गणपाला पाहून विचारलं "काय रे गणपा बंगल्यात रात्री कसले आवाज येतात? काल झोपेचं खोबर झालं "हे ऐकून गणपाच्या हातातली प्लेट खाली पडली पण लगेच ती प्लेट उचलत विषय सावरत गणपा म्हणाला "कसलं आवाज बायरुन येत असतील हिकड तसं काय नाय म्या.. म्या चाय घेऊन आलो"असं म्हणत तो आत गेला.

ऑफिसला लेट होतं होता म्हणून तेही जास्त विषय न ताणता ऑफिसला निघाले. ऑफिसमधे आजही आल्या आल्या तो शिपाई भेटला कोणती तरी फाइल द्यायच्या निमित्ताने आला होता "सायेब तुमी जिथे राहता तिथे सर्व ठीक आहे ना? "



" हो का? तू कालही मला असंच काही विचारलं होतंस तुला एवढी काळजी का माझी? "

" सायेब तुमी जिथं राहता ती जागा बरी नाय तुम्हांला तिकडे धोका हाय "

" म्हणजे? "

" तुमच्या आधी दोन सायेब तिथे राहत होते त्यांतले एक दुसऱ्याच रात्री पळून गेले ते परत आले नाहीत आणि दूसरे तर.... दूसरे तर वेडे झाले ते तर अजुनही बरे नाही झाले "

"अरे तुमच्या लोकांच्या अंध श्रध्दा आहेत ह्या अशा अफवा पसरवण्यापेक्षा काही काम करा " एवढं बोलून त्यानी शिपायाला पाठवलं पण त्यांची अस्वस्थता कमी होत नव्हती कारण त्यांनी स्वःत ते आवाज ऐकले होते. आज संध्याकाळी ते लवकर घरी आले लगेच किचनमधे जाऊन गणपाला विचारलं.

" गणपा.... बाहेर या बंगल्याबद्दल लोक काय काय बोलतायेत इथे नक्की काय प्रॉब्लेम आहे "

" काय नाय मालक आव लोकांकडे कुठे लक्ष देताय "



" ठीक आहे मग आज रात्रीपासून तू माझ्याबरोबर इथे थांबायचं... जर गेलास तर याद राख "

" नाय मालक इथं रात्रीचं थांबण धोक्याचं हाय "

" म्हणजे? "

" मालक तुमीबी इथं जास्त वेळ राहू नका निघून जावा इथून "

" नीट सांग हे काय चाललंय ते "

" मालक इथं फार पूर्वी एक सायेब आलेले ते लई विचित्र होतं म्हणे ते कसल्या कसल्या यिद्या करत व्हते त्यांत सर्पबळी पण दिला होता पण तीच शेवटी यांच्या वर ती उलटली आन ते साप डसल्यानेच मेले त्या नंतर अजून दोन सायेब इथं राहायला आले त्यांना पण त्रास झाला येक तर ठार वेडे झाले... तुमीबी इथून जावा नायतर तुमचं बी काय खर नाय.... मालक जेवण तयार हाय म्या चाललो " एवढं बोलून तो पटापट तिथून निघून गेला.

जेवण झाल्यावर कितीतरी वेळ हे घर जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सोडावे हाच विचार करत ते हॉलभर फिरत होते इतक्यात त्यांच्या रूम मधून ग्लास फूटण्याचा आवाज आला म्हणून ते लगेच जीना चढून बेडरूममधे बघायला गेले तर तिथे फक्त फुटलेला ग्लास होता इतक्यात त्यांच्या मागून काहीतरी सरपटत बाहेर गेलं त्यांनी बाहेर जाऊन पहिल तर तिथे दुसऱ्या रूमच्या दरवाजात काहीतरी वळवळताना दिसलं त्यांनी जाऊन लाइट लावली तर तिथे एक काळा साप वेटोळ करून बसला होता इतका



मोठा साप पाहून ते थोडे मागे सरकले तो सरपटत त्यांच्या जवळ येऊ लागला. चव्हाण मागे मागे जात रूममध्ये घुसले आणि लगेच दरवाजा बंद केला आणि तसेच बेडवर जाऊन बसले. एवढा मोठा साप बघून त्यांना दरदरुन घाम फुटला होता.

इतक्यात कोणीतरी काहीतरी सरपटत त्यांच्या बेडच्या बाजूला येऊन बसलं त्यांनी बघितलं तर तो मघासचाच साप होता पण दरवाजा बंद असताना हा आत कसा आला त्यांना कळत नव्हतं तरीही त्यांनी स्वःतला सावरलं आणि धावत जाऊन कोपऱ्यातली काठी घेऊन त्या सापासमोर येऊन थांबले. साप डसनार इतक्यात त्यांनी काठीचे सपासप वार करायला सुरुवात केली तो साप मरेपर्यंत ते वार करतच होते सगळीकडे रक्त पसरल. त्यांचं अंगही घामाने डबडबल शेवटी ते दमून तिथेच जमिनीवर बसले आणि तेवढ्यात त्यांना बुडाखाली हालचाल दिसली त्यांनी बघितलं तर ते एका वेटोळ केलेल्या सापावर बसले होते लगेच स्वतःला कसबस सावरत त्याच काठिचे दोन तीन जोरदार घाव त्याच्या डोक्यावर करून त्याला मारलं.

शेवटी धापा टाकत ते बेडवर बसले आणि बेडच्या बाजूच्या टेबलावरचा पाण्याने भरलेला ग्लास तोंडाला लावला तोपर्यंत घशात काही तरी अडकल्यासारख वाटलं म्हणून पानी थुंकल तर तोंडातून पाण्याबरोबर एक सापाचं पिल्लू बाहेर पडलं ग्लासात पहिल तर सापाची पिल्ल त्यात वळवळत होती. हातातलं ग्लास त्यांनी लगेच झटकून दिलं. ते पाणी जमिनीवर पडून ती पिल्ल त्यात वळवळत होती. ते पाहून तर ओकारीच यायला लागली. इतक्यात पंख्यावरून त्यांच्या गळयात काही तरी पडलं. तो अजून एक साप होता. त्याला बेडवरच झटकून मारायला काठी उगारनार तोच कोपऱ्यातून अजून दोन साप फणा

काढून बसलेले होते. त्यात खिडकीतून अजून दोन साप आत आले चारही बाजूला फक्त साप दिसत होते.

सगळे हळूहळू त्यांच्या जवळ सरकू लागले. चव्हाण मागे जात जात कोपऱ्यात येऊन पोचले. आता कुठे पळायला ही जागा नव्हती समोर फक्त सापच दिसत होते. सगळे हळुहळु त्यांच्या पायाजवळ येऊन पोचले. त्यांना पायावर काहीतरी बुळबुळीत स्पर्श झाला. मागून एक साप पायावर चढला होता. तो जोरात पाय झटकून फेकला. तेवढ्यात दुसरा अंगावर चढला त्यालाही अंगावरून झिडकारला पण चव्हाण पुर्णपणे त्यात अडकले..........

दुसऱ्या दिवशी बंगल्यासमोर वेड्यांच्या इस्पीतळातून एक गाडी येऊन थांबली.... चव्हाण ओरडत होते अंग झटकत होते स्वतःला ओरबाडत होते...... ते गेल्यानंतर पुढचे काही दिवस तो बंगला बंद राहीला.

नंतर पुन्हा एक नवा अधिकारी चव्हाणांच्या बदली आला त्याचे सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले नंतर पुन्हा सुरू झाला तोच सरपटण्याचा आवाज.....



# जनोबा

माझा जन्म मूळचा गावचा पण माझे शिक्षण मुंबईतच झाले. आणि नोकरी ही इथेच. गावचं घर, शेती सर्व वडील पहायचे भाऊ कधी कधी मदतीला इकडून जात असे. आई वारली. नंतर गावचा आणि माझा काही सबंध आला नाही. वडिलांच्या मर्जी विरुद्ध लग्न केलं होतं त्यामुळे त्यांनीही कधी बोलावलं नाही त्यांच्या मृत्यू नंतर भावा बरोबर कार्याला गावाला गेलो एवढंच.

त्यानंतर एका वर्षानी भावाला गावाहून नोटिस आली की आमची जमिनी बाबत काही सरकारी व्यवहार आहेत. बाबांनंतर ती जमीन अशीच पडून राहीली होती त्यामुळे आम्ही ती विकण्याचा निर्णय घेतला. पण भावाला सुट्टी मिळणे शक्य नव्हते. त्यात वहिनी गरोदर होती त्यामुळे मलाच जावं लागणार होतं. त्यानुसार मी वीस दिवसांची रजा घेतली आणि निघायला तयार झालो. दादाने काही गावातल्यांचे नंबर दिले जेणें करून मला मदत होईल आणि काही हॉटेल्सचे पत्ते दिले आणि घरी न जाता हॉटेलवर राहा असे सुचविले. स्वतः चे घर असताना हा मला हॉटेलमधे रहायला का सुचवतोय हे कळत नव्हते. मी त्याबद्दल विचारले तेव्हा त्याने तूझी गैरसोय होईल, घर बरेच दिवस बंद आहे अशी



उडवाउडवीची उत्तरे दिली. पण स्वतःचे घर असताना अशा हॉटेलवर राहणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा होता.

मी गावाला गेलो थोडे हवा पाणी बदलले म्हणून बरे वाटत होते. घराच्या किल्ल्या जवळच होत्या. घर चांगले प्रशस्त होते पाच खोल्या, अंगण, मागे विहीर पण घर बंद असल्याने थोडी धूळ साचली होती. एक दोन माणसे बोलवून मी साफ सफाई करून घेतली आणि रहायला तयार झालो आता फक्त स्वयंपाकाचा प्रश्न होता. दिवसाचा वेळ तालुक्यात कामाला जाणार होता. फक्त रात्रीच्या जेवणाचा प्रश्न होता. त्यासाठी मी एका दोघांना सांगून ठेवले कोणी भेटत का ते पहायला. पण दोन तीन दिवस कोणीच आले नाही. का ते कळत नव्हते. एकदा दोनदा दादाला फोन केला. मी त्या घरात राहतोय हे ऐकून तो चिडलाच त्याने बजावून सुध्दा मी तेथे राहतो हे त्याला आवडले नव्हते. आणि मला कारण ही सांगायला तयार नव्हता.

मीही खोदून विचारल्यावर त्याने सांगितले त्या घरात आत्म्याचा वावर आहे. आणि जरी तुला तेथे रहायचे असेल तर कोणालातरी सोबत घेऊन रहा असे म्हणून रागाने फोन ठेवला. आता आता मला कळू लागले होते की घरी कोण काम करायला तयार का नाही ते आमच्या घराबद्दल गावातल्यांच्या मनात कदाचित गैरसमजूत होती. कारण मी इतके दिवस राहत असताना मला तर असे काही जाणवले नाही. मग हे सर्व काय आहे. असंच विचार करत मी संध्याकाळपर्यंत घरी आलो.



तेव्हा मागच्या खुडबूड झाली मागे जाऊन पाहिलं तर दारात एक म्हातारा माणूस उभा होता. मळकट धोतर, सफेद बंडी, शिडशिडित शरीरयष्टी असा त्याचा अवतार त्याला नीट बघितल्यावर आठवले हा तर बाबांचा नोकर जनोबा... पुर्वी बाबा मुंबईला येत असताना त्यांच्याबरोबर येई. त्याची विचारपूस केल्यावर कळले की आता तो दिवसा कोणा कोणाकडे तरी काम करतो. माझी जेवणाची गैरसोय होतेय हे त्याला कळले म्हणून तो आला. तो आला ते एक बरं झालं. माझा असाही रात्रीच्या जेवणाचा प्रश्न होता. त्यात सोबतही झाली होती.

माझे गावाला दिवस चांगले चालले होते सकाळी तालुक्यात जायचे संध्याकाळी येताना गाव हिंडत यायचे रात्री जनोबाच्या हातचे जेवण जेउन झोपायाचे.

पण एके दिवशी असे काही घडले जे मी कधीच विसरू शकणार नाही त्या रात्री बाराच्या टोल्याने मला जाग आली माझे लक्ष खिडकीतून बाहेर गेले मी पाहिले तर विहिरिकडे कोणीतरी जात होते कोण आहे ते काही कळत नव्हते मी घरातून बाहेर येऊन त्याच्या मागोमाग गेलो तर ते जे कोणी होते त्याने विहिरीत उडी मारली. मी लगेच त्या विहिरीजवळ गेलो आणि माझा ही तोल जाऊन विहिरित पडलो आणि मला जाग आली. ते स्वप्न होते.

मी तेव्हा अगदी घामघुम झालो होतो. ते स्वप्न विसरून मी झोपायचा प्रयत्न करू लागले. इतक्यात बाराचे टोले पडले अगदी मगासससारखेच आणि दरवाजाची कड़ी



आतून खोलल्यासारखा आवाज आला. घरात फ़क्त मी आणि जनोबाच होतो. हा आता कशाला बाहेर गेला हे कळत नव्हते म्हणून मीही घरातून बाहेर आलो तो विहिरीच्या दिशेने जाऊ लागला मीही त्याच्या मागोमाग गेलो त्याचा चेहरा दिसत नव्हता पण घरातून बाहेर पडला म्हणजे जनोबाच असावा. मी त्याच्या मागोमाग चालू लागलो तो विहिरीजवळ येऊन थांबला आणि अचानक त्याने विहिरित उडी घेतली आणि एक जोरात किंकाळी ऐकू आली. मी मागोमाग जाऊन पाहिले तर विहिरिच्या कठड्या वर त्याचे डोके आपटून रक्त सांडले होते आणि त्याचा देह पाण्यावर तरंगत होता. मी हे बघून अक्षरशः घाबरलो आणि शेजाऱ्याना बोलवायला धावलो.

तितक्यात माझे लक्ष जनोबा झोपलेल्या खोलिच्या खिडकीकडे गेलं. आत कोणीतरी होतं. मी जवळ जाऊन नीट पाहिले तर जनोबा आत गाढ झोपला होता. मग आता मी बघितले ते काय होतं? तो कोण होता? त्याचा चेहरा नीट दिसला नव्हता. पण तो जो कोणी होता तो घरातून कसा बाहेर पडला? म्हणून मी परत पाहायला विहिरी जवळ गेलो तर तिथे पाण्यात काहीही मगाशी जिथे रक्त सांडलेल तिथे आता रक्ताचा एक थेंबही नव्हता.

माझं डोक आता गरगरायला लागलं होतं त्याच भीतीत मी परत येऊन झोपण्याचा प्रयत्न केला रात्री उशीरा कधी झोप लागली सकाळी उशीराने जाग आली. तोपर्यंत जनोबा निघून गेला होता. आता तो भेटणार संध्याकाळी. रात्रीची गोष्ट डोक्यातून



जात नव्हती. मी पुन्हा विहिरित येऊन बघितले तर तिथे कोणतेही रक्ताचे डाग नव्हते. पाणी ही स्वच्छ होते.

हे काय चालले आहे काही कळत नव्हते. तेवढ्यात माझ्या लक्षात आले की काल अमावस्या होती. अशा दिवशी असे भास होतात असा विचार करून मी ते सर्व विसरायचा प्रयत्न करू लागलो. काही दिवसांनी इकडचे काम ही संपले. आणि मी परत यायला तयार झालो. येताना जरा जास्तच पैसे जनोबाच्या हातावर ठेवले आणि घराची काळजी घे असे बजावले. त्यावर त्याने " मालक जिवंत असेपर्यंत सेवा केली..... तर मरणांनंतर नाय करणार का? " उदगार काढले.

" हो बाबांची ते असेपर्यंत तू भरपूर सेवा केलीस तू होतास म्हणून तर सर्व नीट चालु होतं.. चल " असे म्हणून मी निरोप घेतला आणि मुंबईला आलो. आता कधी एकदा दादाला भेटतोय आणि त्याची खेचतोय असे झाले होते.

मी दादाला भेटायला गेलो. मला पाहून त्याने प्रश्नांचा भडिमार सुरू केला घर कसे आहे?

भीती नाही वाटली ना?

सोबतीला कोण होते?



मी त्याला शांत पणे सांगितले घरात भूत काय भुताचे नखही नव्हते. त्यात सोबतीला जनोबा होता मग भिती कसली?

माझे बोलणे ऐकून त्याच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला. वहिनिहि घाबरली दोघेही एकमेकांकडे बघू लागले. मी त्याला याचे कारण विचारले तेव्हा त्याने जे काही सांगितले ते ऐकून माझाच चेहरा पांढरा पडायची वेळ आली त्याच्या मते तू म्हणतोयस भुताचं नखही नाही बघितलंस मग राहिलास कोणा बरोबर?? जनोबाचा बाबांच्या मृत्यूच्या एक महीना आधीच घरामागच्या विहिरित पडून मृत्यू झाला. पण अजूनही अनेकांना घरात तो दिसतो. बाबांनाही दिसायचा म्हणून मी तुला तेथे नको राहुस सांगितले होते. हे सर्व ऐकून माझा मेंदू बधिर झाला. आणि कानात फ़क्त जनोबाचे वाक्य घुमत होते.

" मालक...... जिवंत असेपर्यंत सेवा केली मग मरणांनंतर नाही करणार का?"

तेव्हा तो बाबांच्या नाही कदाचित स्वतः च्या मरणाबद्दल बोलत होता.



# पैंजण

आनंद आज दोन वर्षांनी गावाला येत होता. गाव तसं मागसलेलंच.. पण आनंदची घरची परिस्थिती तशी चांगली. शिक्षणही ठीक घेतलं. दोन वर्षांपूर्वी नोकरीसाठी मुंबईला गेला. तिकडेच स्थायिक झाला. सध्या आईची तब्येतीच्या कुरबुरी चालू होत्या. तिला भेटायच्या निमित्ताने तो आला होता.

रात्रीचे साढ़े बारा वाजले होते. एस. टी. गावच्या फाट्यावर येऊन थांबली. त्यातून आनंद उतरला. एक बॅग खांद्यावर एक हातात घेऊन चालू लागला. इतक्या रात्री रिक्षा मिळणं अशक्य होतं. आणि हा इतक्या रात्री येईल म्हणून घरीही कोणाला कल्पना नव्हती. त्यामुळे कोणी घ्यायलाही येणार नव्हतं. म्हणून पायीच जावं लागणार होतं. रोडने जायचं तर फार लांब होतं. म्हणून शॉर्टकट म्हणून त्याने नानाच्या वाडीतून जायचं ठरवलं. ही एक पायवाट होती. आजुबाजुला छोटी मोठी झाडी, गावच्या मातीचा गंध दरवळत होता, रातकिड्यांचा आवाज येत होता.

आनंद नानाच्या वाडीपर्यंत पोचला. दूरवर वाडी दिसत होती. मालक नसल्याने रया गेली होती. नानाचा विहिरीत पडून मृत्यू झाला. त्यानंतर ही वाडी अशीच बेवारस पडून होती. इतक्यात आनंद थोडा दचकला. "आयला आपल्या लक्षात कसं नाही



आलं...... कुठून आलो आपण " आनंद तोंडातल्या तोंडात पुटपुटला आणि थोड्या वेगाने चालू लागला.

नाना विहीरीत पडून मेला होता. पण त्या नंतरही लोकांना तिथे चित्रविचित्र भास व्हायचे. कधी कधी रात्री तर लोकांना त्याच्या वाडीतून आवाज यायचा. आता आनंदला भीती वाटू लागली होती. इतक्यात त्याला मागून चर्र्र आवाज आला त्याने मागे वळून पाहिलं. मागे कोणीच नव्हतं तो तसाच पुढे चालू लागला. पुन्हा तोच आवाज चर्र चर्र.. त्याने पुन्हा मागे वळून पाहिलं. आताही कोणीही नव्हतं.

आनंदला आता थोडी भीती वाटू लागली. तो झपझप पावले टाकू लागला. तो चर्र चर्र आवाज पुन्हा येऊ लागला. तो चामड्याच्या चप्पलांचा आवाज होता. कोणी तरी त्याच्या मागून मागून येत होतं. तो आवाज हळुहळु जवळ येऊ लागला होता. आनंद आणखी जोरात चालू लागला तरीही तो आवाज जवळ येतच होता. आनंदला चांगलाच घाम फुटला होता. तो आवाज आता त्याच्या अगदी जवळ आला आणि आनंदच्या खांद्यावर थाप पडली आनंद जागेवरच थांबला आणि डोळयांच्या कोपऱ्यातून मागे वळून पाहिलं आणि......... एक सुटकेचा निश्वास सोडला कारण मागे तर त्याचा लहानपणीचा मित्र गणप्या होता.

आनंदचा जीव आता कुठे भांड्यात पडला. " आईशप्पत आपण उगाचच इतके घाबरलो "असं मनातल्या मनात म्हणाला. गणप्या भेटला ते बरं झालं घरी यायला सोबत



पण भेटली. गप्पाटप्पा करत लहानपणीचे जुने किस्से आठवत कधी घर आलं ते कळलंच नाही. घर आल्यावर आनंद घराकडे जायला निघाला तसं त्याला गणप्याने थांबवलं त्याला आनंदला काहीतरी सांगायचं होतं पण हिम्मत होतं नव्हती कदाचित....

"अरे बोल ना काय झालं? "आनंदने न राहवून विचारलं.

"तूझा मुंबईक चांगला चलला हा मा? "गणप्या बोलला.

" अगदी मस्त... पण का रे? "

" एक काम करशीत? "गणप्याने अवघडल्या स्थितित विचारले

"काय? "

" माझ्या छकुलीच्या पायात चांदीचा पैंजण घालशीत.. पोर दोन वर्षाची झाली रे पण बाप म्हणून तिच्या अंगावर एक दागिना टाकायची ऐपत नाय माझी.... " एका झटक्यात त्याने मनातले सगळे बोलून टाकले

"एक शेवटची इच्छा पूरी कर बाबा "एवढं बोलताना त्याचे डोळे पानावले.

" देईन पैंजण त्यात काय एवढं... आणि शेवटची इच्छा काय.... लगेच खपणार आहेस काय? "



" तसं नाय रे पण देशीत मा? लय उपकार होतीत बघ.. "

" ए हेमण्या आता उपकाराची भाषा केलीस तर बघ... तुझी पोरगी माझी कोण नाय का??? ..." आनंद लटक्या रागात बोलला. चल निघतो.....

आनंद गणप्याचा निरोप घेऊन घरी आला. रात्री मस्त झोप काढल्यावर सकाळी थोडा उशीराच जाग आली. आंघोळ वैगरे करून चहासाठी माजघरात आला. आई चुलीजवळ बसली होती आणि वहिनी भांडी लावत होती.

"आव भावजी इतक्या रातसुन चलत खेका ईलास? फोन तरी करुचा होतास... हे इले असते. "वहिनी भांडी लावत बोलली.

"अगं त्याला काय होतंय आणि असंही शॉर्टकटने आलो "आनंद चहापीत बोलला.

दोघींच्याही नजरा भीतीने आनंदकडे वळल्या.

" खयचो शॉर्टकट "आईने भीतीने विचारलं.

"नानांच्या वाडीतून गं "आनंद बोलला



" अरे माझ्या कर्मा.... हितक्या रातसुन नानाच्या वाडीतसुन ईलस?? घाबरलस नाय मा? "आई डोक्याला हात लावून बोलली.

" त्यात घाबरायचं काय आणि गणप्या पण होता बरोबर.. "

"कोण गणप्या? "वाहिनीने विचारलं.

" आपला गणप्या गं.... खालच्या आवटातला.. "आनंद वहिनीकडे पाहत बोलला.

हे ऐकून वहिनी दचकली आणि लावत असलेले भांडं तिच्या हातातून खाली पडलं "मी... मी जरा इलाय हा "असं बोलून ती तिथून बाहेर जाऊ लागली.

" हिला काय झालं एवढं दचकायला? " आनंदने आश्चर्याने विचारलं

" तू त्या वाडीतसुन खेका ईलस?? रस्त्यासुन येऊक काय झालेला?? "आईने रागवून विचारलं.

" अगं पण काय झालं? "

" तुका त्याने काय केल्यान नाय ना? "



" अग तो कशाला मला काय करेल? नक्की काय झालंय?? " आनंदने विचारलं त्याला कळत नव्हतं हे सगळे असे घाबरलेले का आहेत.

"आरे गणप्या एका वर्षापुर्वी गेलो " आई आनंदकडे पाहत बोलली

" काय?? .... म्हणजे?? " आनंदला धक्काच बसला.

" हो रे.... आधीच गरीबी पाचवीक पुजलेली त्यात चुलत्यान जमीन हडपल्यान आणि ह्याने कोर्ट कचेऱ्यात होते नव्हते सगळे पैसे घालवलंय त्यात बायको अशी कैदाशीन ती पण दिवस रात्र टोमणे मारून हैरान करूक लागली. माँग काय बिचाऱ्यान नानाच्या विहीरीत उडी मारून जीव दिल्यान...... " आई हळव्या स्वरात बोलत होती " पण पोरीवर मात्र भारी जीव हां.... सगळयांका बोलत होतो पोरीक पैंजण करूचा हा पैंजण करूचा हा पण नाही जमला बिचाऱ्याक... "

आनंद उरलेला चहा तिथेच टाकून विषण्ण मनाने खोलीतून बाहेर आला. त्याला रात्रीचा गणप्याचा रडवेला चेहरा दिसत होता आणि कानात त्याचेच शब्द ऐकू येत होते.................... " माझ्या छकुलीच्या पायात चांदीचं पैंजण घालशीत ना... येक शेवटची ईच्छा पूरी कर बाबा ".



# भूतबंगला

कर्र् कर्र्.... हलणाऱ्या आराम खुर्चीचा आवाज बेडरूममधे घुमत होता. त्यावर शशिकलाबाई मागेपुढे आरामात हेलकावे घेत होत्या भिंतीवरच्या भल्यामोठ्या घड्याळात बारा वाजून पाच मिनीट झाली होती बंगल्यात अंधार होता. शशिकला बाईंची नजर त्यांच्या भिंतीवरच्या फोटोवर होती.

लग्नानंतर काही दिवसांनी हा फोटो काढला होता हातात हिरवाचूड़ा, गळयात दागदागिने, डोक्यावर घेतलेला पदर चेहऱ्यावर तजेल कांती त्यांना आपले पूर्वीचे दिवस आठवत होते. नवरा बायको एक मुलगा एक मुलगी असं चौकोनी कुटुंब. नवऱ्याचं अकाली निधन झालं पण न डगमगता हिम्मतीने शशिकला बाईंनी पुढे व्यवसाय चालवला मुलं मोठी झाली त्यांची लग्न केली ती परदेशात गेली आणि तिथेच स्थायिक झाली. त्या नंतर शशिकला बाई एकट्या पडल्या त्या पडल्याच. मागे एकदा जिन्यावरुन घसरुन पडल्या. डोक्याला खोक पडून रक्तही फार गेलं. पण मदतसुध्दा वेळेवर भेटली नाही.



तो बंगलाही मुख्य रस्त्यापासून, रहदारीपासून लांब. त्या मुळे सगळीकडे नीरव शांतता...

अंगणात काही खुडबुड झाली. शशिकलाबाई हळुवार चालत खिडकीपाशी आल्या कंम्पाउंड वॉलच्या बाजूला दोन तीन सावल्या वळवळताना दिसत होत्या. कोणीतरी वॉलवर चढण्याचा प्रयत्न करत होतं. एकाने वॉलवर चढून आत उडी मारली. वयाने मध्यमसा, कृश शरीरयष्टी, अंगात बंडी धोतर, डोक्यावरुन घेतलेलं कांबळ आणि एका हातात पहार कडी उचकटण्यासाठी कदाचित तो चोर होता. त्याच्या पाठोपाठ त्याच्या दोन साथीदारांनेही उडी मारली. त्या दोघांची शरीरयष्टी पहिल्याच्या सारखीच.. दुसऱ्याच्या हातात लांब लचक बॅटरी आणि तिसऱ्याच्या कमरेला मात्र धारदार कोयता लटकत होता.

त्यातला पहिला बोलला "नाऱ्या काढ बा लवकर एक एक घोट मारू "

नाऱ्याने आपल्या बंडीच्या खिश्यातून चपटी काढली त्याचा एक घोट घेऊन हनम्याकडे फिरवली.

"सर्ज्या खबर पक्की हाय ना घरात कोनबी नाय ते? "दुसरा बंगल्याकडे पाहत बोलला.



" न्हाय रे कोनबी नाय आणि आसलच तर काय करायचं ते बी आपल्याला माहितीच हाय की "सर्ज्या आपल्या कमरेवरच्या कोयत्यावर हात फिरवत बोलला. "चला कामाला लागा "त्यांच्या कुजबुजण्याचे आवाजवर शशिकला बाईपर्यंत थोडेफार ऐकु आले. आजकाल आसपासच्या परिसरात चोरी, दरोडे वाढले होते.

शशिकलाबाई आपल्या खुर्चीवर येऊन बसल्या त्यांच्या बेडरूमचा दरवाजा बंद होता. शांततेत आवाज चांगले ऐकु येत होते. हॉलच्या खिडकीचा बोल्ट खटकन तुटल्याचा आवाज झाला त्या बरोबर खिडकीचे दरवाजे खाडकन उघडले. एकेक करत तिघांचेही पावलंचे आवाज फरशीवर उमटले. तिघांची पावले हॉलभर फिरत होती इतक्यात कोणाचातरी धक्का लागून कोपऱ्यातला फ्लॉवरपॉट खाली पडला खळकन फुटला.... "हनम्या बैला, एक दिस तूझ्यामुळे आमचाबी जीव जाणार हाय "सर्ज्याचा आवाज हॉलमधे घुमला. एकाने हॉलमधल्याच बेडरूमचा दरवाजा खोलल्याचा आवाज आला तिघेही आत आले आत पलंग, एक टेबल, दोन खुर्च्याशिवाय काही नव्हतं तिघांनी पलंगाचे कप्पे उघडून बेड उलटा पालटा करून पहिलं तिथे काही नव्हतं. तिघेही एक एक करून बाहेर आले समोरच्या रूमकडे वळले पण तिथे काय मिळण्याची शक्यता नव्हती कारण तिथल फर्निचरही केव्हाच हलवलं होतं.

तिघेही वरच्या मजल्यावर जायला पायऱ्यावर चढू लागले. जिन्याला सफेद रंगाच्या टाइल बसवल्या होत्या त्यावर लाल रंगाचे पुसटसे रक्ताचे डाग होते कधी काळी



पडलेले पण नीट न पुसल्याने तसेच राहिले होते. तिघेही एका मागोमाग एक पायऱ्या चढत वरच्या मजल्यावर आले. शशिकला बाईंच्या बाजूच्या बेडरूमच्या दरवाजापर्यंत येऊन पोचले. दरवाजाची कडी वर खाली फिरवण्याचा आवाज आला दरवाजा लॅच लॉक होता नंतर दोन तीन वेळा दरवाजावर जोरात धक्के दिले गेले आणि तो बाजूच्या बेडरूमचा दरवाजा धाडकन उघडला. तिघे आत आले पूर्ण रूममधे बॅटरी मारली कोपऱ्यात एक कपाट होतं ते त्या कपाटाजवळ आले. हनम्याने हातातली पहार कपाटाच्या दोन दाराच्या फटीत घुसवली आणि रात्रीच्या शांततेत दरवाजा पेचण्याचा आवाज येऊ लागला. कपाट जुनं होतं पण मजबूत होतं. तिघांनी जोर लावल्यानंतर दरवाजा तुटून बाजूला पडला पण कपाटही पूर्ण खाली होतं त्यात काहीच नव्हतं.

"आरं पूर घर शोधल काय बी नाय कसं? "नाऱ्याने विचारलं

"न्हाय रे इतका मोठा बंगला असा खाली कसा असल? "हनम्या विचार करत बोलला.

शशिकला बाईंच्या बेडरूममधून पुन्हा खुर्चीचा कर्र कर्र आवाज येऊ लागला तो आवाज ऐकून सर्ज्याच्या डोक्यात प्रकाश पडला.

"आरं बाजूची खोली तर बघायचीच राहिली "सर्ज्या त्या दोघांकडे पाहत पुटपुटला.



ते दोघे बाकीचे ड्रॉवर धुंडाळण्यात बेड उलट पालट करण्यात व्यस्त होते म्हणून सर्ज्या एका हातात बॅटरी घेऊन एकटाच निघाला.

त्यांच्या हालचालींचे आवाज शशिकला बाईंच्या रूमपर्यंत सहज येत होते. बाजूच्या रूममधे तिघेजण घुटमळत होते पण त्यातल्या एक बाहेर आला होता आणि त्यांच्या रूमच्या दिशेने येत होता. त्याच्या पावलांचा आवाज रूमच्या दरवाजासमोर येऊन थांबला. जे कोणी होतं ते त्यांच्या रूमसमोर होतं. आणि बॅटरी दरवाजावर रोखली जमिन आणि दरवाजामधल्या फटीतून बॅटरीचा प्रकाश दिसत होता. दरवाजावर एक जोरदार धक्का बसला आणि दरवाजा उघडला. शशिकलाबाईंचं तोंड दरवाजाच्याच दिशेला होते. दरवाजात एक माणूस उभा होता ज्याच्या बॅटरीचा प्रकाश सरळ त्यांच्यावर पडत होता तो माणूस त्यांना बघून जागीच खिळला. त्याचा श्वास भीतीने गळयातच अडकला. हातातली बॅटरी खाली पडली आणि बंद झाली तो जोरात ओरडला "निघा रं.... इथून.... निघा.... " असं म्हणत तो जिन्याकडे धावला आणि जिन्यावरुन त्याचा धडपडत खाली जाण्याचा आवाज आला.

त्याला असं पळताना पाहून हनम्या आणि नाऱ्या सावध झाले. हनम्या हातातली पहार सावरून त्या रूमकडे जाऊ लागला त्या पाठोपाठ नाऱ्याही जाऊ लागला ते दोघेही त्या रूमच्या दरवाजाजवळ आले. आतल दृश्य पाहून दोघेही भांभावले हनम्याच्या हातातली पहार गळून पडली दोघांचेही पाय लटपटू लागले. आत एक बाई खुर्चीवर बसली



होती. तिच्या कपाळाला मोठी खोक पडली होती. त्यातून निघणारं रक्त तिच्या चेहऱ्यावरुन साडीवर ओघळत होतं, रक्ताने तिचा एक डोळा पूर्ण लाल झालेला तर दुसरा पूर्ण सफेद होता. ती ह्यांच्याकडेच पाहत होती.

ते सर्व पाहून कसेबसे ते दोघे जिन्याकडे धावले जिन्यावरुन धडपडत अंधारात खिडकी गाठली आणि कसबस स्वतःला बंगल्याबाहेर लोटलं. बंगल्यापासून दूरवर त्यांच्या धावत जाण्याचा आवाज येत होता. काहीवेळाने बंगल्यात नीरव शांतता पसरली. शशिकला बाईं पुन्हा झोके घेऊ लागल्या त्यांची नजर पुन्हा आपल्या फोटोवर खिळली.

काळानुसार त्यावर धूळ जमा झाली होती कोपऱ्यात कोळयाचं जाळं दिसत होतं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे त्या फोटोवरचा चंदनाचा हार जुना होऊन केव्हाच तुटून गळून पडला होता....



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत . महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेबसाईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये



मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!

